मासिक वार्तापत्र • अंक 32 • एप्रिल 2023 • सहयोग मूल्य : रु. 10 • 12 पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


मलियाना हत्याकांडातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता! 3

सामाजिक वरकडाच्या उत्पादनाची सुरुवात आणि सामाजिक श्रम विभाजन व वर्गांचा उदय 6

भगतसिंह जनअधिकार यात्रेचा पहिला टप्पा पूर्ण 11


## कामगार-कष्टकरी जनतेने अमृतपाल सिंहसारख्या व्यक्तींपासून सावध राहण्याची गरज का आहे?

### कोणताही अस्मितावाद हा कामगार वर्गाच्या विरोधातच आहे!

‘खलिस्तान’ चळवळीला पुन्हा उभे करू पाहणाऱ्या अमृतपाल सिंह याला अनेक दिवस फरार राहिल्यानंतर 23 एप्रिल रोजी अटक झाली आहे. या निमित्ताने खलिस्तानच्या मागणीसारख्या अस्मितावादी मागण्या, त्यांचे वर्गचरित्र आणि कामगार वर्गाचा त्यांप्रती दृष्टिकोण यांचा प्रश्न पुन्हा एकदा महत्त्वाचा बनला आहे. कामगार वर्गाचे काही छोटे हिस्से सुद्धा सैद्धांतिक कमजोरींमुळे अशा मागण्यांचे समर्थन करताना दिसतात, त्यामुळे सुद्धा या प्रश्नावरील चर्चा महत्त्वाची बनली आहे.

समाजातील आर्थिक-सामाजिक-राजकीय परिस्थिती बिघडत असताना एखादा “तारणहार”, “मसिहा”, “भूमिपुत्र” सारखा नेता, जो चुटकीसरशी सर्व समस्या सोडवू शकतो, जो इतिहासातील (कधी नसलेला!) सुवर्णकाळ परत आणू शकतो, उभा करणे ही भांडवली राजकारणाची एक जुनी क्लुप्ती आहे, जिचा वापर वेळोवेळी केला जात आला आहे. यातूनच कधी हिंदूंचा तारणहार म्हणून मोदी, मराठी व्यक्तींचा तारणहार म्हणून ठाकरे, मुस्लिमांचा तारणहार म्हणून ओवेसी, तर पंजाबींचा वा शीखांचा तारणहार म्हणून भिंद्रनवाले किंवा अमृतपालसारखे व्यक्ती समोर आणले जातात. अशा “नायक” प्रतिमा असलेल्या व्यक्तींच्या द्वारे समाजातील प्रश्नांच्या खऱ्या वर्गीय शोषणाच्या कारणांना बगल देऊन त्यांच्याजागी जात, धर्म, प्रांत अशा अस्मितांची स्थापना केली जाते आणि जनतेच्या विविध हिश्श्यांना एकमेकांशी लढवण्याचे काम सत्ताधारी भांडवलदार वर्ग करतो. भांडवलदार वर्गाच्याच विविध प्रतिस्पर्धी गटांद्वारे एकमेकांच्या विरोधात सुद्धा अशाप्रकारच्या नायकांच्या निर्मितीद्वारे, अस्मितावादी राजकारणाच्या खेळी खेळल्या जातात. अमृतपाल याच प्रकारचा एक मसिहा आहे, ज्याचे शीख

संपादक मंडळ

अस्मितावादी राजकारण थेट कामगार वर्गाचा हितांच्या विरोधात आहे हे समजणे गरजेचे आहे.

#### अजनाला येथील घटना व उत्तरार्ध

यावर्षी 23 फेब्रुवारी रोजी अमृतसरजवळील अजनाला येथे एक विलक्षण घटना घडली. सुमारे आठशे मजबूत सशस्त्र लोकांनी अजनाला पोलिस स्टेशनवर हल्ला केला व कब्जा केला. मायक्रोफोनचा वापर करत त्यांनी आतून भाषणे दिली आणि बाजूने जमलेल्या माध्यमांना संबोधित सुद्धा केले. या जमावाचे नेतृत्व अमृतपाल सिंह याने केले होते. अमृतपाल हा 30वर्षीय दुबईतील एक अभियंता-व्यावसायिक जो अचानक कट्टरपंथी शीख धर्मोपदेशक बनला होता. तो गेल्या सहा महिन्यांपासून राज्यभर प्रवास करत होता, शिखांसाठी ‘खलिस्तान’चे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचे आवाहन करत होता आणि स्वत:च्या पद्धतीने व्याख्यायित केलेल्या शीख सनातनी वृत्तीकडे परत जाण्याचे आवाहन करत होता. त्याच्या हल्ल्यामागील धाडसी कृत्यामागचा उद्देश त्याचा सहकारी लवप्रीत सिंह “तुफान” याची सुटका करणे हा होता, ज्याच्यावर अमृतपाल व पाच समर्थकांसह अपहरण आणि प्राणघातक हल्ला केल्याचा आरोप होता. हल्लेखोरांनी लवप्रीतला तुरुंगातून सोडवण्यासाठी पोलिसांवर यशस्वी दबाव आणला आणि एकही अतिरिक्त गुन्हा दाखल न होता ते निघून सुद्धा गेले.

अमृतपाल आणि त्याच्या समर्थकांनी बॅरिकेड्स तोडण्यासाठी आणि पोलिस स्टेशनच्या दिशेने ढकलण्यासाठी “पालकी साहिब”, म्हणजे गुरुग्रंथ साहिब हा धार्मिक ग्रंथ असलेल्या एका बसचा ढाल म्हणून वापर केल्यामुळे कारवाई करू न शकल्याचे पोलिसांनी कारण दिले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोळीबार केल्याने आणखी समस्या निर्माण झाल्या असत्या व त्यामुळे त्यांनी “डावपेचांच्या” धोरणाचा अवलंब केला. या कृत्यातील बेफिकीरपणामुळे आणि घटना घडल्यानंतरही पोलीस अमृतपालवर कारवाई करण्यास टाळाटाळ करत राहिले यामुळे, भांडवली प्रसारमाध्यमांमध्ये खळबळ उडाली. प्रत्येक राष्ट्रीय वृत्तपत्रातील संपादकीयांनी पंजाबमधील कायदा

पान 4 वर

## “विश्वगुरू”ची भाषा करणाऱ्या, “देशभक्त” भाजपचे विदेशी विद्यापीठांना आमंत्रण

### शिक्षणाच्या धंद्याचे आले आणखी “अच्छे दिन”

✎ अभिजित

विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) “भारतात विदेशी उच्च शिक्षण संस्थांचे कॅंपस स्थापित करणे आणि संचालनाकरिता नियमावली, 2023” जाहीर केली आहे, ज्यानुसार आता विदेशी विद्यापीठांना भारतात शिक्षणाचा धंदा करण्याची आणि नफा परत मायदेशी पाठवण्याची परवानगी दिली गेली आहे. युजीसीने 2021 मध्ये जाहीर केलेल्या उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांना पुढे नेत आणि मोदी सरकारने जाहीर केलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण (2020) नुसार हा निर्णय घेतला गेला आहे, ज्यानुसार जगातील “सर्वोच्च” विद्यापीठांना देशात प्रवेश देण्याकरिता नियमावलीची शिफारस करण्यात आली आहे. एकीकडे या निर्णयाने शिक्षणाच्या बाजारीकरणाला अजून गती मिळेल, तर दुसरीकडे याच निर्णयाने भाजपच्या ढोंगी राष्ट्रवादी प्रचाराची सुद्धा पोलखोल केली आहे. शिक्षणाच्या धंद्याला खुली सूट

या नियमावलीनुसार विदेशी विद्यापीठांना भारतातील शिक्षणसंस्थांना लागू होणारे कायदे लागू होणार नाहीत. या संस्थांचा कारभार कसा चालावा, फी संरचना, देशी आणि विदेशी विद्यार्थ्यांकरिता प्रवेश प्रक्रिया, देशी आणि विदेशी प्राध्यापकांची भरती, आणि त्यांच्या मायदेशात निधी परतावा या संदर्भात त्यांना पूर्ण स्वातंत्र्य असणार आहे. ही विद्यापीठे ग्रॅज्युएट, पोस्ट-ग्रॅज्युएट, पीएचडी सारखे सर्व डिग्री प्रोग्राम आणि डिप्लोमा, सर्टीफिकेट प्रोग्राम सुद्धा चालवू शकतील. प्रवेश प्रक्रिया वा भरतीसंदर्भातील सुटीचा अर्थ हा सुद्धा आहे की या विद्यापीठांमध्ये एस.सी., एस.टी. वा इतर कोणतेही आरक्षणाचे नियम लागू होणार नाहीत.

या धोरणाअंतर्गत ऑस्ट्रेलियातील डिकीन विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ असणार आहे जे गुजरात इंटरनॅशनल फायनान्स टेक सिटी (गिफ्ट सिटी), गांधीनगर येथे पहिले दुकान टाकणार आहे. ऑस्ट्रेलियातीलच वोल्लोनगाँग आणि तत्सम इतर विद्यापीठे सुद्धा अर्ज करून भारतात प्रवेश करण्याच्या मार्गावर आहेत.

शिक्षणाच्या धंद्याच्या ध्वजवाहकांनी या निर्णयाचे स्वागत करत “ग्राहकांना” फायदे सांगणे सुरू केले आहे की यामुळे जास्त वैविध्यपूर्ण अभ्यासक्रम मिळतील, देशाचे विदेशी चलन वाचेल, विदेशात शिकण्यापेक्षा देशात शिकल्यामुळे

पान 10 वर

# महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि धर्मवादाच्या विरोधात भगतसिंह जनअधिकार यात्रेचा पहिला टप्पा पूर्ण

पान 7 वरून

2020 रद्द करावे. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व नागरिकांना समान व मोफत शिक्षण देण्यात यावे आणि शिक्षणाचे खाजगीकरण समाप्त केले जावे. शिक्षणाला शारीरिक श्रमासोबत जोडले जावे, त्यात लष्करी प्रशिक्षण सक्तीचे केले जावे, शिक्षण वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध बनवले जावे आणि त्याला पूर्णपणे लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष स्वरूप दिले जावे.

7. 'सर्वधर्म समभाव' या बनावट धर्मनिरपेक्षतेच्या जागी, खरे धर्मनिरपेक्ष राज्य स्थापित करण्यासाठी एक कायदा आणला जावा, ज्याच्या अंतर्गत कोणत्याही राजकीय नेत्याकडून सार्वजनिक जीवनात कोणत्याही धर्माचा, समुदायाचा किंवा श्रद्धेचा कोणत्याही स्वरूपात उल्लेख करणे, त्याचा वापर करणे हा दंडनीय गुन्हा ठरेल. सरकारने स्वतःला सर्व धार्मिक कार्यापासून पूर्णपणे अलिप्त करावे, मग ते कोणत्याही धर्माचे असो. सर्व शाळा, महाविद्यालये, सरकारी विभाग इत्यादींमध्ये कोणत्याही धर्माचे प्रतीक, चिन्हे किंवा प्रार्थनांना बंदी घालावी.

8. केवळ अस्पृश्यताच नव्हे तर कोणत्याही प्रकाराने किंवा कुठल्याही स्वरूपातील जातीय भेदभाव हा दंडनीय गुन्हा म्हणून घोषित करण्यासाठी संविधानात दुरुस्ती केली जावी. जातीच्या आधारावर संघटना बनवणे, संस्था निर्माण करणे, विवाहविषयक जाहिराती देणे इत्यादींवर पूर्ण बंदी असावी.

9. निवडणुकांमधील सर्व पक्ष आणि सरकारद्वारे होणाऱ्या भ्रष्टाचारावर बंदी घालण्यात यावी आणि त्यासाठी जनतेने निवडलेल्या लोकसमित्यांच्या देखरेखीत सार्वजनिक लेखापरीक्षण आणि चौकशीची व्यवस्था करण्यात यावी. सर्व तपास आणि देखरेख संस्थांना सरकारच्या नियंत्रणाबाहेर आणून त्यांचे उत्तरदायित्व या लोकसमित्यांप्रती निश्चित केले जावे.

10. सर्व नागरिकांना घराचा मूलभूत हक्क दिला जावा. यासाठी एक विशेष कायदा बनवला जावा आणि सरकारी घरांची एक सार्वत्रिक व्यवस्था निर्माण केली जावी, जिथे घरांच्या खरेदी-विक्रीवर, मालमत्तेच्या खरेदी-विक्रीमध्ये सट्टेबाजीवर पूर्ण बंदी असावी.

11. स्त्री-पुरुषांना समान कामाला समान वेतनासाठी कठोर कायदा करण्यात यावा. महिलांसोबतचा सर्व प्रकारचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक भेदभाव संपवण्यासाठी आवश्यक कठोर कायदे केले जावेत. अर्थातच, हे विसरता कामा नये की, संपूर्ण सामाजिक-आर्थिक संरचना बदलल्याशिवाय केवळ कायद्याने लैंगिक असमानता संपवता येणार नाही.

12. गरीब आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी (2 हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेले) बियाणे, खते, वीज इत्यादींवर अनुदानाची योग्य व्यवस्था करण्यासाठी श्रीमंत वर्गावर विशेष कर लादण्यात यावा. त्यांच्यासाठी सिंचनाच्या व्यवस्थेचे व्यापक जाळे निर्माण करण्याची जबाबदारी सरकारने घ्यावी आणि त्यांच्यासाठी सुलभ अटी आणि कमी व्याजदर असणाऱ्या संस्थात्मक कर्जाची व्यवस्था करावी जेणेकरून ते श्रीमंत शेतकरी, आडते, व्यापारी, सावकार इत्यादींकडून जास्त दराने कर्ज घेण्याच्या सक्तीपासून मुक्त होतील. तात्कालीकरित्या, मनरेगा योजनेंतर्गत वाटप वाढवावे, त्याअंतर्गत पूर्ण वर्षभरासाठी रोजगाराचा अधिकार द्यावा आणि कमीत कमी ठरलेल्या किमान मजुरीएवढ्या रकमेचे वाटप करावे.

13. धार्मिक आणि जातीय शत्रुत्व भडकावणे, हिंसाचार आणि 'मॉब लिंचिंग' इत्यादींमध्ये सहभागी असलेल्या सर्व प्रकारच्या संघटना, पक्ष इत्यादींवर बंदी घालावी, त्यांना दहशतवादी संघटना म्हणून घोषित करून त्यांच्या नेत्या-कार्यकर्त्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर : 74992 64646

• पुणे : 8669735643


## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.

## 'कामगार बिगुल'चे सर्व वाचक आणि हितचिंतक यांना आवाहन

'कामगार बिगुल'च्या सर्व वाचकांना आणि हितचिंतकांना आमचे आवाहन आहे की जर आपण या प्रकाशनाचे महत्त्व समजत असाल आणि जनतेचे प्रसारमाध्यम उभे करण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक आवश्यक भाग मानत असाल, तर खालील मार्गांनी 'कामगार बिगुल' सुरू ठेवण्यात आम्हाला साथ द्या:

1. कामगार बिगुलची वार्षिक, पंचवार्षिक वा आजीवन सदस्यता घ्या.
2. जर तुमची सदस्यता संपली असेल, तर तिचे नुतनीकरण करा.
3. 'कामगार बिगुल' चे वितरक बना. याला जास्तीत जास्त संख्येने कामगार-कष्टकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात तुमची भूमिका बनवा.
4. 'कामगार बिगुल' करिता नियमित आर्थिक सहयोग द्या.

आम्ही जनतेच्या शक्तीवर विश्वास ठेवतो आणि आमच्या अनुभवाने सिद्ध केले आहे की कोणतीही तडजोड न करता, एका विचाराने जोडलेल्या लोकांची एकत्र मेहनत, आणि सहयोगाच्या जिवावर मोठी कामं होऊ शकतात. याच शक्तीच्या आधारावर गेली अनेक वर्षे कामगार बिगुल प्रकाशित होत आहे. तुम्ही साथ द्याल, याचा विश्वास नक्कीच आहे.

## बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

जर तुम्ही आमच्याशी व्हॉट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा :
http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp
चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा :
9892808704



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**


# कामगार बिगुल
खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# मलियाना हत्याकांडातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता!

## असे खोटे निकाल देशातील न्यायप्रेमी जनता कदापि मान्य करणार नाही!

✍ सत्यम

1947 पासून देशात हजारो जातीय दंगली झाल्या ज्यात हजारो लोक मरण पावले आणि लाखो कुटुंबे उद्ध्वस्त झाली. दंगलीत झालेल्या जीविताच्या व मालमत्तेच्या जखमा कालांतराने भरून निघतात, पण न्याय न मिळाल्याच्या आणि खुनी व पाशवी गुन्हेगारांना पुन्हा पुन्हा वाचवले जाण्याच्या जखमा कधीच भरून येत नाहीत.

बहुतांश दंगलींमध्ये पोलीस आणि प्रशासनाची भूमिका संशयास्पद असली किंवा उघडपणे दंगलखोरांच्या बाजूने असली, तरी याहीपुढे जाऊन अशा काही लाजिरवाण्या घटना घडल्या आहेत, ज्यावरून "जगातील सर्वात मोठी लोकशाही" म्हणवणाऱ्या या देशाचा खरा कारभार दिसून आला आहे; ज्या नेहमीच कुरूप कलंकाप्रमाणे राहतील अशाच घटनांपैकी एक घटना आहे मलियाना दंगलींची. या घटनेचा आणखी एक लाजिरवाणा अध्याय नुकताच लिहिला गेला आहे.

गेल्या तीन दशकांतील "न्यायाच्या नाटका" दरम्यान 800 हून अधिक सुनावण्यांनंतर, मेरठच्या जिल्हा न्यायालयाने "अपुऱ्या पुराव्यांमुळे" सामूहिक हत्याकांडातील सर्व 40 आरोपींची निर्दोष मुक्तता केली. मलियाना प्रकरणात मुळात 93 आरोपींचा समावेश होता. त्यानंतरच्या 36 वर्षात अनेक आरोपींचा मृत्यू झाला, आणि इतर अनेकांचा "शोध लागला नाही" आणि आता उर्वरित 40 जणांना निर्दोष सोडण्यात आले आहे. मलियाना येथील 72 मुस्लिमांना "कोणीही मारले नाही" असे आता पुन्हा बोलले जात आहे!


मात्र, न्यायाच्या नावाखाली हे अश्लील प्रहसन 36 वर्षांपूर्वी खोटा एफ.आय.आर. दाखल करून सुरू झाले!

### 1987 मेरठ दंगल, मलियाना आणि हाशिमपुरा हत्याकांड

मे 1987 मध्ये मालियाना हत्याकांड घडले होते. 1986 मध्ये बाबरी मशिदीचे कुलूप उघडल्यामुळे निर्माण झालेल्या जातीय तणावादरम्यान उत्तर प्रदेशातील मेरठमध्ये हिंदू आणि मुस्लिमांमध्ये हिंसक संघर्ष झाला. यानंतर शहरात शांतता राखण्यासाठी राज्य सरकारने प्रांतीय सशस्त्र कॉन्स्टेब्युलरीच्या (पी.ए.सी.) 11 कंपन्या तैनात केल्या. पण शांतता राखण्याच्या नावाने पी.ए.सी.ने जिल्ह्यात ठिकठिकाणी मुस्लिमांवर हल्ले सुरू केले. स्थानिक मीडिया आणि नंतर राष्ट्रीय माध्यमांद्वारे तसेच अनेक गैर-सरकारी संस्था आणि तपास पथकांनी दिलेल्या अहवालांद्वारे याची पुष्टी केली गेली आहे.

22 मे रोजी, पी.ए.सी. मेरठमधील हाशिमपुरा परिसरात पोहोचले, मोठ्या संख्येने ट्रकमध्ये लोकांना घेऊन गेले, घरे आणि दुकाने लुटली आणि त्यांना आग लावली. उचललेल्यांपैकी काहींना मेरठ आणि फतेहगढ येथील तुरुंगात पाठवण्यात आले, परंतु 42 मुस्लिमांवर गाझियाबादमधील मुरादनगर येथे गंगा कालव्याजवळ आणि उत्तर प्रदेश-दिल्ली सीमेजवळील हिंडन नदीजवळ गोळ्या झाडण्यात आल्या आणि त्यांचे मृतदेह पाण्यात फेकण्यात आले. दरम्यान, मारहाणीमुळे मेरठ आणि फतेहगड तुरुंगात बंद 11 जणांचा कोठडीत मृत्यू झाला.

दुसऱ्या दिवशी पी.ए.सी. मलियानाजवळ पोहोचले. अनेक प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की 44 व्या बटालियनचे कमांडंट आर.डी. त्रिपाठी यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील पी.ए.सी.ने 23 मे 1987 रोजी पहाटे 2.30 वाजता मलियानामध्ये प्रवेश केला आणि 72 मुस्लिमांची हत्या केली. पी.ए.सी. च्या तुकडीत बंदुका आणि तलवारींनी सज्ज शेकडो स्थानिक लोक सुद्धा होते. हत्याकांड करण्यापूर्वी या भागाकडे जाणारे पाचही रस्ते बंद करण्यात आले होते. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, "चाऱ्ही बाजूंनी मृत्यूचा पाऊस पडत होता. मारेकऱ्यांनी लहान मुले आणि महिलांसह कोणालाही सोडले नाही."



हाशिमपुरा 1987

या हत्याकांडात पोलीसच सहभागी असताना एफ.आय.आर. नोंदवण्याचा प्रश्नच नव्हता. काही दिवसांनंतर, जेव्हा तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी आणि उत्तर प्रदेशचे काँग्रेसचे मुख्यमंत्री वीर बहादूर सिंग यांनी मलियानाला भेट दिली आणि राजीव गांधींनी तपास आणि अहवालांबद्दल विचारले, तेव्हा पोलिसांनी याकुब अली या स्थानिक नागरिकाला एका कागदावर स्वाक्षरी करण्यास भाग पाडले. पी.ए.सी. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या याकुबला नंतर कळले की त्याने स्वाक्षरी केलेल्या कागदावर तर एफ.आय.आर. आहे. या एफ.आय.आर.मध्ये 93 जणांवर हत्येचा आरोप करण्यात आला होता, ज्यापैकी एकही पोलीस नव्हता. परिसरातील मतदार यादीतून 93 जणांची नावे काढून एफ.आय.आर. मध्ये टाकण्यात आली होती असे दिसते. काही आरोपींनी या हत्याकांडात भाग घेतला होता, पण अनेक असे होते ज्यांचा हत्याकांडाशी काहीही संबंध नव्हता. पोलिसांनी या लोकांचा अटकेसाठी शोध सुरू केला तेव्हा कळले की 23 मे 1987 पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता! काहींचा खटल्यादरम्यान मृत्यू झाला आणि काही लोक अजूनही "बेपत्ता" आहेत.

ज्या पद्धतीने हा खटला चालला आणि ज्या धर्तीवर असे सर्व हत्याकांडांचे खटले चालवले गेले आहेत, त्याला पाहता उशिरा का होईना सर्वांची निर्दोष सुटका होते यात आश्चर्य नाही. मात्र यावेळी संघ आणि भाजप सरकारच्या दबावाखाली घाईघाईने हा निर्णय घेण्यात आला आहे, अशी शंका घेण्यास कारणे आहेत. गुजरातमधील बिल्किस बानो बलात्कार आणि हत्या प्रकरणातील आरोपींची निर्दोष मुक्तता, मुस्लिमांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये सामील असलेल्यांची सुटका करून त्यांना संपूर्ण देशभरात संरक्षण देणे, या मालिकेचाच हा एक भाग आहे. या सगळ्यातून भाजप आपल्या समर्थकांना कोणते संकेत देत आहे, हे समजणे अजिबात अवघड नाही.

मलियानाचा खटला 36 वर्षे फरफटत चालला होता, परंतु अचानक हा निर्णय जाहीर झाला तेव्हा कायदेशीर कार्यवाही सुद्धा पूर्ण झाली नव्हती. 36 शवविच्छेदनात सुनावणी झाली नव्हती आणि दंड संहितेच्या कलम 313 अंतर्गत आरोपींची उलटतपासणीही झाली नव्हती. इथपर्यंत की साक्षीदारांची तपासणीही पूर्ण झाली नव्हती. न्यायालयात 10 पेक्षा कमी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हजर करण्यात आले, जेव्हा की एकूण 35 साक्षीदार हजर होते. सरकारी वकिलांच्या म्हणण्यानुसार, निर्दोष सुटण्याचे कारण म्हणजे पोलिसांनी परेडमध्येही आरोपींची ओळख पटवली नाही, मतदार यादीतील 93 नावे मनमानी पद्धतीने एफ.आय.आर.मध्ये समाविष्ट केली आणि घटनास्थळावरून कोणतेही शस्त्र जप्त केले गेले नव्हते.

या संपूर्ण प्रकरणावर सुरुवातीपासूनच पडदा टाकण्यात आला. या हत्याकांडानंतर काही दिवसांनी मुख्यमंत्री वीर बहादूर सिंग यांनी 10 जणांच्या मृत्यूची घोषणा केली. दुसऱ्या दिवशी जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी 12 जणांचा मृत्यू झाल्याचा दावा केला. त्यानंतर जून 1987 च्या पहिल्या आठवड्यात एका विहिरीतून अनेक मृतदेह बाहेर काढल्यानंतर जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी 15 जणांचा मृत्यू झाल्याचे मान्य केले. काही दिवसांनंतर, राज्य सरकारने मलियानामध्ये एकूण 56 लोकांचा मृत्यू झाल्याचे स्वीकारले आणि नुकसानभरपाईच्या नावावर मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 20,000 रुपयांची तुटपुंजी रक्कम सुपूर्द केली. अनेक वर्षांनी त्यांच्या जखमेवर मीठ चोळून अजून 20-20 हजार रुपये देण्यात आले. नंतर, उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या न्यायालयीन चौकशीनंतर, पी.ए.सी.चे कमांडंट, आर.डी. त्रिपाठी यांच्या निलंबनाची घोषणा करण्यात आली. या अधिकाऱ्यावर 1982 च्या मेरठ दंगलीतही गंभीर आरोप आहेत. मलियाना हत्याकांडातील गुन्हेगारी सहभागाचे सर्व पुरावे आणि सरकारी घोषणा असूनही त्रिपाठी यांना प्रत्यक्षात कधीही निलंबित करण्यात आले नाही. उलट सेवानिवृत्तीपर्यंत त्यांना पदोन्नती मिळत राहिली.

मलियानामध्ये पी.ए.सी.ची तैनाती अव्याहतपणे सुरू राहिली, त्यामुळे साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात अडथळा निर्माण झाला. जानेवारी 1988 मध्ये श्रीवास्तव आयोगाच्या आदेशानुसार पी.ए.सी. काढून टाकल्यानंतर, आयोगाने 84 साक्षीदारांचे जबाब नोंदवले, त्यापैकी 70 मुस्लिम आणि 14 हिंदू होते. याशिवाय प्रशासनातील 5 जणांचे जबाबही घेण्यात आले आहेत. आयोगाची कारवाई केवळ दिखावा होती आणि अखेरीस जुलै 1989 मध्ये त्यांनी अहवाल सादर केला, जो कधीही सार्वजनिक केला गेला नाही. श्रीवास्तव आयोग मलियाना प्रकरणाची चौकशी करत असताना, उत्तर प्रदेश सरकारने 18 ते 23 मे दरम्यानच्या मेरठ दंगलीच्या प्रशासकीय चौकशीचे आदेशही दिले, परंतु त्यात मलियाना घटना आणि मेरठ आणि फतेहगढ तुरुंगातील कोठडीतील मृत्यूंचा समावेश नव्हता. त्याचा अहवालही सार्वजनिक करण्यात आला नाही पण 'द टेलिग्राफ' या वृत्तपत्राने नोव्हेंबर 1987 मध्ये तो पूर्ण प्रकाशित केला. यामध्ये सुद्धा 23 मेच्या घटनांची चर्चा केलेली नव्हती.

एप्रिल 2021 मध्ये, ज्येष्ठ पत्रकार कुर्बान अली आणि माजी आय.पी.एस. अधिकारी विभूती नारायण राय यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली, ज्यामध्ये 23 मे 1987 च्या घटनांच्या तपासासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आणि निष्पक्ष आणि जलद सुनावणीचे आवाहन केले. याचिकेनुसार, एफ.आय.आर.सह अनेक महत्त्वाची कागदपत्रे रहस्यमयरित्या गायब झाली आहेत आणि पोलीस आणि पी.ए.सी.चे लोक पीडितांना आणि साक्षीदारांना वारंवार धमकावत आले आहेत. हाशिमपुरा हत्याकांडातील 2018 च्या निकालात 16 पोलिस दोषी आढळले आणि त्यात मारले गेलेल्या 42 मुस्लिमांच्या कुटुंबीयांना 20 लाख रुपये नुकसानभरपाई मिळाली. मात्र मलियानाच्या हत्येप्रकरणी पोलिसांचे नावही आले नाही. अलाहाबाद उच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला प्रत्युत्तरात प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले होते. ही जनहित याचिका अद्याप उच्च न्यायालयात प्रलंबित असली तरी, आता मेरठ न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केल्यानंतर बरीच शक्यता आहे की राज्य सरकार उच्च न्यायालयाला ही केस बंद करण्याचे आवाहन करेल.

न्यायालये आणि चौकशी आयोगांच्या निकालात दाबल्या गेलेल्या अनेक खटल्यांप्रमाणे हा खटलाही बंद केला जाईल, पण मलियानाची जनता आणि या देशातील न्यायप्रेमी जनता असे खोटे निकाल कधीच स्वीकारणार नाही. मलियानाचे प्रकरण पुन्हा एकदा लक्षात आणून देते की कोणत्याही रंगाचा झेंडा असलेले निवडणूकबाज भांडवली पक्ष जातीय दंगली रोखू शकत नाहीत किंवा गुन्हेगारांना शिक्षाही देऊ शकत नाहीत. कष्टकरी जनतेच्या नेतृत्वाखालील क्रांतिकारी पक्षाच्या नेतृत्वाखाली एक मजबूत जनआंदोलनच यासाठी दबाव निर्माण करू शकते आणि खऱ्या धर्मनिरपेक्षतेच्या आधारावर समाजाच्या पुनर्रचनेचा मार्ग खुला करू शकते.

(मूळ लेख मजदूर बिगुल, एप्रिल 2023 मध्ये प्रकाशित)

अनुवाद: निश्चय

# कोणताही अस्मितावाद हा कामगार वर्गाच्या विरोधातच आहे!

पान 1 वरून

आणि सुव्यवस्थेबद्दल शोक व्यक्त केला आणि राज्य आणि केंद्र सरकारने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यास खलिस्तान चळवळीच्या पुनरुत्थानाचा इशारा दिला. जवळपास एक महिन्यानंतर, पंजाब पोलिसांनी संपूर्ण पंजाबमध्ये इंटरनेट सेवा स्थगित केल्या आणि मोठ्या प्रमाणावर धरपकड सत्र सुरू करत पाशवी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत अमृतपालच्या शेकडो साथीदारांना अटक केली. अमृतपाल मात्र पळून जाण्यात यशस्वी झाला आणि 23एप्रिल रोजी त्याला अटक झाली.

अजनाला येथील घटना अचानक घडलेली घटना नव्हती. अनेक दशकांच्या खलिस्तान चळवळीचा आणि तिच्या मुळाशी असलेल्या भांडवलदार वर्गाच्या आपसातील स्पर्धेचा इतिहास तिच्यामागे आहे. खलिस्तान चळवळीचा इतिहास समजण्याअगोदर राष्ट्रीय प्रश्नावर मार्क्सवादी समजदारी जाणणे गरजेचे आहे.

## राष्ट्रवाद, राष्ट्रीय दमन, आणि धर्माधारित राष्ट्र कल्पना

राष्ट्र या संकल्पनेचा उदयच युरोपात भांडवलशाहीच्या विकासासोबत झाला. समाईक भाषा, प्रदेश, आर्थिक जीवन आणि मानसिक घडण जी समाईक संस्कृतीत अभिव्यक्त होते, अशा ऐतिहासिकरित्या बनलेल्या लोकांचा स्थिर समुदाय म्हणजे राष्ट्र अशी व्याख्या कॉ. स्टॅलीन यांनी त्यांच्या “मार्क्सवाद आणि राष्ट्रीय प्रश्न” या लेखात राष्ट्र संकल्पनेच्या भांडवली विकासासोबत झालेल्या अभ्यासाच्या आधारावर केली आहे. सरंजामदार वर्गाविरोधात चालू असलेल्या संघर्षात एका भूप्रदेशात एक कायदा, व्यापाराचे स्वातंत्र्य, एक राजकीय नियंत्रण याला अधिमान्यता मिळवण्याकरिता भांडवलदार वर्गाने राष्ट्र कल्पनेला जन्म दिला आणि त्या आधारावर प्रदीर्घ काळात सत्ता संघटित सुद्धा केल्या. या आधारावरच युरोपातील अनेक देशात राष्ट्र-राज्ये (एका राष्ट्रात एक सत्ता) बनली, पण सोबतच जिथे भांडवलदार वर्गाचे विविध गट संयुक्तपणे सहअस्तित्त्व बनवू शकले तिथे स्वित्झर्लंड सारखे बहुराष्ट्रीय देशही (अनेक राष्ट्रे एकत्र मिळून बनलेला देश) बनले. “राष्ट्र” या कल्पनेद्वारेच भांडवलदार वर्ग ही भ्रामक कल्पना स्थापित करत जातो, की भांडवलदारांचे हितच कामगार वर्गाचे आणि जनतेचे हित आहे! म्हणूनच राष्ट्रवाद ही एक भांडवली विचारधारा आहे.

धर्माच्या आधारावर राष्ट्र ही कल्पना त्यामुळेच गैर-मार्क्सवादी आहे. स्वतंत्र पाकिस्तानची मागणी होत असताना सीपीआयने केलेले त्या मागणीचे समर्थन म्हणूनच एक चूक होती, जी त्यांनी लागलीच सुधारली होती, परंतु देशाच्या कम्युनिस्ट आंदोलनात राष्ट्रीय प्रश्नाबद्दलच्या सैद्धांतिक कमजोरीने अशाप्रकारचे नुकसान अनेकदा केले आहे.

राष्ट्र संकल्पनेच्या वरील समजदारीच्या आधारावर भारत हा सुद्धा विविध राष्ट्रीयतांनी (तमिळ, तेलुगू, मराठी, हिंदी, पंजाबी, इत्यादी) बनलेला एक बहुराष्ट्रीय देश आहे. परंतु भारताच्या स्वातंत्र्यचळवळीच्या काळातच भारत एक एकसंघ बाजार म्हणून निर्मित झाला, आणि आपसातील प्रादेशिक स्पर्धा असूनही देशात एका संयुक्त (कंपोझिट) बहुराष्ट्रीय भांडवलदार वर्गाचा जन्म झाला. यात सुरुवातीला जरी गुजराती, मारवाडी भांडवलदारांचे वर्चस्व होते, तरी स्वातंत्र्याच्या 75 वर्षांच्या काळात इतर प्रादेशिक भांडवलदारांचा देशातील बाजारपेठेत वाटा सतत वाढत गेला आहे. जम्मू-काश्मीर आणि उत्तर-पूर्वेकडील काही भागांचा अपवाद वगळता देशाच्या इतर सर्व भागातील भांडवलदार वर्ग राज्यसत्तेचा वाटेकरी (अपेक्षेप्रमाणे असमानच, कारण भांडवली विकास नेहमीच असमान असतो) आहे आणि त्यामुळे हे अपवाद वगळता देशाच्या स्तरावर “राष्ट्रीय दमन” (म्हणजे एखाद्या राष्ट्रातील भांडवलदार वर्गासहित सर्व जनतेचे राजकीय दमन) अस्तित्वात नाही.

संसाधने आणि बाजारावर कबजा करण्याची भांडवलदार वर्गातील स्पर्धा राष्ट्रीय दमनाचे कारण बनते. राष्ट्रीय दमन अस्तित्वात असेल तर प्रमुख कार्यभार राजकीय स्वातंत्र्याचा बनतो. परंतु कामगार वर्ग आपापसात स्पर्धा करत नाही, कामगार वर्ग राष्ट्रवादी नव्हे तर आंतरराष्ट्रीयतावादी असतो, आणि म्हणूनच तो स्वेच्छेने निर्मित मोठ्यात मोठ्या राज्याचे समर्थन करतो. म्हणूनच जेथे राष्ट्रीय दमन अस्तित्वात नाही, तेथे कामगार वर्ग तो प्रश्न “उपस्थित” करत नाही.

पंजाबी भांडवलदार वर्ग सुद्धा देशातील संयुक्त बहुराष्ट्रीय भांडवलदार वर्गाचा एक लक्षणीय हिस्सा आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे मालक असण्यापासून, एकंदरीत भांडवलाच्या मोठ्या हिश्शेदारीपासून ते पोलीस, सैन्य, अधिकारी वर्गातील मोठमोठी पदे आणि राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यासारखी पदे सुद्धा पंजाबी भांडवलदार वर्गाच्या वाट्याला आली आहेत. देशव्यापी बाजारपेठेचा लाभार्थी पंजाबी भांडवलदार वर्ग सुद्धा आहे. त्यामुळेच पंजाबी राष्ट्राचे दमन भारतात अस्तित्वात नाही. यामुळेच खलिस्तानच्या चळवळीला कधीही पंजाबमध्ये मोठे जनसमर्थन मिळाले नाही आणि पंजाबी कृषी भांडवलदार वर्गाचा एक छोटा हिस्सा वगळता पंजाबी भांडवलदार वर्गाचा मोठा हिस्सा तिच्या विरोधातच राहिला.

अशामध्ये स्वतंत्र शीख राज्याची मागणी धार्मिक आधारावर राष्ट्राची कल्पना असल्यामुळे समर्थनीय नाही, आणि “पंजाबी” भाषिक स्वतंत्र राष्ट्राची मागणी सुद्धा राष्ट्रीय दमनाच्या अभावी चुकीचीच ठरते. खलिस्तान चळवळीच्या विश्लेषणात सुद्धा आपण या गोष्टींचा पडताळा घेऊ.

## खलिस्तान चळवळीचे वर्ग विश्लेषण

भांडवली विकास हा असमानच असू शकतो. भांडवलदार वर्गाच्या विविध हिश्श्यांमध्ये (औद्योगिक, वित्तीय, वाणिज्यिक; मोठे, मध्यम, छोटे; प्रादेशिक, देशस्तरीय, इ.) असलेल्या स्पर्धेचे नियमन नफ्याच्या दराच्या सरासरीकरणाद्वारे , आणि राज्यसत्तेच्या सक्रिय हस्तक्षेपातून होत असते. हे नियमन समाधानकारकरित्या होत असेल तर भारतासारखा बहुराष्ट्रीय भांडवलदार वर्गही जन्माला येऊ शकतो, जो एक बहुराष्ट्रीय राज्य संघटित करतो. परंतु स्पर्धा आणि असमानता कायम राहते, त्यामुळे एकता ते नेहमीच टिकवू शकतील, किंवा राज्यसत्तेच्या भुमिकेबद्दल एकमत राहील असे नाही. म्हणूनच विविध प्रकारच्या प्रादेशिक स्वायतत्तेच्या, वा स्वतंत्र होण्याच्या मागण्या याच वर्गाचे इतर हिस्से उभ्या करत राहतात. राजकीय संघर्षाद्वारे एकंदरीत लुटीतील आपला वाटा वाढवणे हेच त्यामागचे उद्दिष्ट असते. खलिस्तानची मागणी सुद्धा पंजाबी कृषी भांडवलदार वर्गाच्या एका असंतुष्ट हिश्श्याच्या समर्थनातून जन्माला आलेली मागणी आहे, ना की समस्त पंजाबी जनतेतून.

भारत स्वतंत्र होण्याअगोदरच खलिस्तानची मागणी जन्माला आली होती, परंतु तिला असलेले जनसमर्थन अत्यंत तुटपुंजे होते. भारत स्वतंत्र होत असताना बंगाली भाषिक जनतेचे ज्याप्रमाणे विभाजन झाले, त्याचप्रमाणे पंजाबी भूभागाचे सुद्धा भारत व पाकिस्तानात विभाजन झाले, आणि अनेक हिंदू व शीख भारतात परत आले. भारतात भाषिक प्रांतरचना झाल्यानंतर हरियाणा, हिमाचलचे काही भाग आणि चंडीगढ पंजाबपासून वेगळे केले गेले. याच्या परिणामी आजच्या पंजाब, हरियाणा सहीत राजस्थान व हिमाचलचे काही भाग आणि पाकिस्तानातील पंजाबपर्यंत महाराज रणजीत सिंह यांनी 18 व्या शतकात स्थापलेला पंजाबचे स्वप्न हे राजकीय अपेक्षाभंग झालेल्या, आपल्या वर्चस्वाचा विस्तार करू पाहणाऱ्या, पंजाबी भांडवलदार वर्गाच्या एका हिश्श्याचे स्वप्न राहिले आहे. शिखांचे प्रतिनिधित्व करणाच्या दावा करणाऱ्या, 1920 मध्ये स्थापन झालेल्या ‘अकाली दल’ पक्षाने याच आधारावर ‘पंजाबी सुभा’ चे आंदोलन 50 च्या दशकात उभे केले होते.

चंडीगढचे केंद्रशासित प्रदेश बनणे, आणि पंजाबमधील नद्यांचे पाणी इतर राज्यांना देणे या मागण्यांवरून असंतोष असताना सुद्धा 1972 च्या निवडणुकांमध्ये काँग्रेसने अकाली दलाला हरवले होते. काँग्रेस हा नेहमीच देशव्यापी बड्या भांडवलदार वर्गाचा पक्ष होता. काँग्रेसचा तेव्हाचा विजय सुद्धा याचाच निदर्शक होता की पंजाबी भांडवलदार वर्गाचा मोठा हिस्सा, जो काँग्रेसमध्ये संघटित होता, तो देशव्यापी संयुक्त बहुराष्ट्रीय भांडवलदार वर्गाचा हिस्सा होता, आणि पंजाबमध्ये राष्ट्रवादी आंदोलनाचा आधार कमजोरच होता.

याच्या परिणामी अकाली दलाने 1973 मध्ये परिषद बोलावून ‘आनंदपूर साहिब घोषणापत्र’ जाहीर केले, ज्याद्वारे पंजाबसहित सर्व राज्यांना अधिकाधिक स्वायत्तता देण्याची आणि शीख धर्माला हिंदू धर्मापेक्षा स्वतंत्र धर्म म्हणून मान्यतेची मागणी केली गेली. अकाली दलाने तेव्हाही स्वातंत्र्य मागत नसल्याचा सतत पुनरुच्चार केला, जो स्पष्टपणे हे दाखवत होता की भारताच्या बाजारपेठेपासून तुटणे पंजाबी भांडवलदार वर्गाला तेव्हाही स्वीकारार्ह नव्हते. आनंदपूर साहिब घोषणापत्रातील मागण्या—जसे की जमीन सुधारणा कायद्यातील “अतिरेक” कमी करणे, अमृतसर येथे “ड्रायपोर्ट्” स्वरूपातील विमानतळाची (निर्यातीकरिता) निर्मिती, शेतीमध्ये वैविध्यीकरण, हमीभाव, शेतीमध्ये विमा, शेतीमध्ये यांत्रिकीकरण, शेतीवरील संपत्तीकर आणि इस्टेटकर रद्द करणे, नद्यांचे पाणी जास्त मिळणे—स्पष्टपणे त्यामागे उभ्या असलेल्या, आणि वेगाने वाढत असलेल्या शेतकी भांडवलदार वर्गाच्या मागण्या होत्या. औद्योगिक आणि शेतकी भांडवलदार वर्गामधील संघर्ष यामागे काम करत होता. 70 च्या दशकातच या वर्गाचा एक आधार इंग्लंड (युके) आणि कॅनडा स्थित पंजाबींमध्ये सुद्धा उभे राहणे सुरू झाले.

80च्या दशकात हा संघर्ष तीव्र होत जाऊन पुन्हा खलिस्तानच्या मागणीचे रूप त्याने घेतले. यामागे भौतिक कारणे होती. हरित क्रांतीनंतर पंजाबमध्ये वर्ग विरोधाभास तीव्र झाला. हरित क्रांतीने देशातील अन्न संकट सामाजिक उपायांच्या सोबतीने (जसे की जमिनीचे वितरण, सट्टेबाजी-साठेबाजी-काळाबाजार विरोधी कायदे, सहकारी संस्थांची निर्मिती, इत्यादी) नाही तर फक्त मोठ्या तंत्रज्ञानाद्वारे आणि पश्चिमेकडून आयात केलेले भांडवलाद्वारे हाताळण्याचा प्रयत्न केला. उच्च उत्पन्न देणाऱ्या मेक्सिकन संकरित बियाण्यांना जास्त सिंचन, अधिक खते आणि कीटकनाशकांची आवश्यकता होती. पंजाबमधील शेतकऱ्यांचा वरचा फक्त एक छोटा भाग इतकी उच्च गुंतवणूक खर्च करू शकत होता. परिणामी, पंजाबमधील भांडवली शेतीच्या विकासामुळे भांडवलदार शेतकऱ्यांच्या (कुलक) एका लहान परंतु शक्तिशाली वर्गाच्या हातात जमीन आणि इतर मालमत्ता केंद्रित झाल्या. स्वतः मोठ्या प्रमाणावर भांडवली शेती करणाऱ्या आणि त्याचवेळी भांडवली खंडाद्वारे शेती करवणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या धनिक शेतकऱ्यांचा वर्ग भारतात सर्वत्रच निर्माण झाला, परंतु हरित क्रांतीचे केंद्र असल्यामुळे पंजाबमध्ये या वर्गाचे प्राबल्य होते.

औद्योगिक आणि वित्तीय भांडवलासोबतच्या संघर्षात, पंजाबी शेतकी भांडवलदार वर्गाने धर्माचे हत्यार वापरत, सीमांत आणि भूमिहीन शेतकऱ्यांसोबत बंध निर्माण करण्यासाठी शीख धर्माच्या विचारसरणीला चालना दिली. शीख धर्माच्या नावाखाली कुलकांनी पंजाबच्या बाजारपेठेवर आपले वर्चस्व बळकट करण्याचा प्रयत्न केला आणि संचार, चलन, संरक्षण व परराष्ट्र व्यवहार वगळता इतर सर्व खाती राज्यांकडे हस्तांतरित करण्याची मागणी केली किंवा भारतापासून संपूर्ण स्वातंत्र्याचा दावा केला.

काँग्रेसच्या वर्चस्वाला आव्हान देण्याकरिता 1982 मध्ये अकाली दलाने शीख धर्मवादावर जोर वाढवला, आणि जर्नेलसिंह भिंद्रनवाले या शीख धर्मगुरूच्या सहाय्याने ‘धर्म युद्ध मोर्चाची’ सुरुवात केली. धनिक शेतकरी आणि गरीब-मध्यम शेतकऱ्यांचे वर्गहित एक नाही. परंतु राजकीय शक्ती बनवण्यासाठी, मध्यम आणि गरीब शेतकरी वर्गाचा पाठिंबा मिळवण्यासाठी सुद्धा पंजाबमधील कुलक वर्गाला शीख धर्माचा आश्रय घेणे आणि त्याद्वारे “एकतेचा” आभास निर्माण गरजेचे बनले होते. पंजाबमधील नद्यांवर बनणारे (सतलज-यमुना कालव्यासारखे) कालवे रोखणे (नेहर रोको मोर्चा), भांडवली शेतीच्या हमीभाव-सिंचन-बियाणे-खते या मागण्या, औद्योगिक विकासात पंजाबचा वाटा कमी होत असलेली भावना, आणि यातून निर्माण झालेली स्वायत्ततेची मागणी आंदोलनाने उचलल्या होत्या.

इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारने नमते न घेतल्यावर अकाली दल या युतीतून मागे सरकू लागले, आणि भिंद्रनवालेची शक्ती अजून वाढत गेली, आणि आनंदपूर साहिब घोषणापत्राच्या लढ्याचा प्रमुख नेता भिंद्रनवाले बनला. भिंद्रनवालेच्या प्रभावाखाली

पान 5 वर

# कोणताही अस्मितावाद हा कामगार वर्गाच्या विरोधातच आहे!

पान 4 वरून

आंदोलनाने अधिकाधिक हिंसक, धार्मिक आणि खलिस्तानच्या रूपाने फुटिरतावादी रूप घेतले. परिणामी ऑक्टोबर 1983 मध्ये पंजाबमध्ये आणीबाणी लावली गेली. भिंद्रनवालेने सुवर्ण मंदिरात आश्रय घेतला. त्याविरोधात इंदिरा गांधी सरकारने "ऑपरेशन ब्ल्यु स्टार" मध्ये सुवर्ण मंदिरात सैनिकी कारवाई करून भिंद्रनवाले आणि खलिस्तानी अतिरेक्यांना संपवले. याच्याच परिणामी शीख अंगरक्षकांनी इंदिरा गांधींची गोळ्या घालून त्याच वर्षी हत्या केली.

अकाली दलाने यानंतर खलिस्तानच्या मागणीपासून स्वत:ला दूर ठेवणे सुरू केले. अकाली दलाचा अमृतसर गट मात्र खलिस्तानचे समर्थन करत राहिला. 1985 मध्ये राजीव गांधी आणि अकाली दलाचे नेते लोंगोवाल यांच्यात झालेल्या राजीव-लोंगोवाल कराराने आनंदपूर साहेब घोषणापत्राच्या तुलनेत अत्यंत कमजोरी अटींवर तडजोड घडवली. परिणामी लोंगोवाल यांची खलिस्तान समर्थकांनी हत्या केली. खलिस्तान चळवळीने यानंतर काही वर्षे जास्त व्यापक रूप धारण केले. 1986 साली 'सरबत खालसा' बोलावली गेली आणि खलिस्तानची मागणी केली गेली. बब्बर खालसा आणि इतर दहशतवादी गट याच काळात सक्रिय झाले. देशात, विदेशात हल्ले, विमान बॉंबस्फोटासारख्या कारवाया, 1995 मध्ये मुख्यमंत्री बियंत सिंहांची हत्या असे सत्र सुरू राहिले. परंतु सैन्य व पोलिसांद्वारे केले गेलेले पाशवी दमन, आणि घटते जनसमर्थन यामुळे 90 चे दशक संपताना पंजाबमध्ये खलिस्तानच्या चळवळीचा दहशतवाद जवळपास संपला होता.

जर्नेलसिंह भिंद्रनवाले, ज्यांनी डावपेचांचा भाग म्हणून स्वतः कधीही खलिस्तानच्या वेगळ्या राज्याचे खुले जोरदार समर्थन केले नाही, त्यांना खलिस्तानच्या कारणासाठी खलिस्तान समर्थकांमध्ये शहीद म्हणून ओळखले जाऊ लागले. खलिस्तानचे शिल्लक राहिलेले समर्थक लढ्याला भविष्यात पुन्हा सुरू करण्यासाठी योग्य संधीची वाट पाहू लागले.

जिकडच्या काळात 2020-21 मध्ये कॉर्पोरेट आणि कृषी भांडवलदारांना पुन्हा एकदा समोरासमोर आणणाऱ्या शेतकरी चळवळीने त्यांना अशी संधी दिली. सत्ताधारी आरएसएस-भाजप खलिस्तान चळवळीबद्दल सहानुभूतीच्या कोणत्याही सार्वजनिक अभिव्यक्तीचे दमन करणार आणि चळवळीचे दहशतवादी रूप दाखवून दडपशाही कायद्यांचा वापर करणार याची जाणीव असल्यामुळे यावेळी खलिस्तान चळवळीचे नेतृत्व सावधपणे वागत होते. त्यांनी सुरुवातीला स्वत:ला कुलक वर्गाच्या आर्थिक मागण्यापुरतेच (जनतेची सहानुभूती मिळवण्यासाठी 'शेतकऱ्यांच्या मागण्या' असा वेष घालून) मर्यादित ठेवले, आणि शेतकरी आंदोलनादरम्यान लाल किल्ल्यावर 2021 च्या गणतंत्र दिनी शिखांचे निशाण साहेब फडकवण्यासारख्या कृतींवर प्रतिक्रिया देण्यापासूनही स्वत:ला दूर ठेवले.

### दीप सिद्धू आणि "वारिस पंजाब दे" ची विचारधारा

शेतकरी आंदोलनादरम्यान लाल किल्ल्यावर शीख ध्वज फडकावला गेला होता. या आंदोलनाचे नेतृत्व दीप सिद्धू याने केले होते. सिद्धू यांचे ठाम मत होते की निदर्शने केवळ शेतीच्या बिलांसाठी नव्हती, तर "सत्तेचे संपूर्ण समीकरण बदलले पाहिजे", याकरिता होती. त्यांच्या भाषणात त्यांनी अनेकदा भिंद्रनवाले यांचा उल्लेख केला होता परंतु भाषा मात्र अशी होती की शेतकऱ्यांचा संघर्ष संघराज्य वाचवण्यासाठी आणि पंजाबच्या अधिकारांसाठी होता. इतर संघटनांनी सिद्धूला प्रक्षोभक म्हटले आणि तरुणांमधील त्याच्या वाढत्या प्रभावाकडे खोचक नजरेनेच पाहिले. सिद्धूच्या "शंभू मोर्चा"नेच दिल्लीच्या दिशेने कूच करण्यासाठी सर्वप्रथम हरियाणा पोलिसांचे बॅरिकेड्स तोडले आणि इतर संघटनांना त्याचे अनुसरण करण्यास भाग पाडले. सप्टेंबर 2021 मध्ये, सिद्धूने "पंजाबच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी, लढा देण्यासाठी आणि सामाजिक समस्या मांडण्यासाठी दबाव गट" म्हणून काम करणारी "वारिस पंजाब दे" ही सामाजिक-राजकीय संघटना स्थापन केली .

सिद्धूने त्याच्या संघटनेच्या उद्देशाचे केलेले वर्णन लक्षात घेण्याजोगे आहे.

*"[वारीस पंजाब दे] हे त्यांच्यासाठी एक व्यासपीठ आहे जे पंजाबच्या सध्याच्या सामाजिक वास्तवावर समाधानी नाहीत. हे एक सामाजिक व्यासपीठ आहे. आपण सर्व काही निवडणुकांपर्यंत नेतो पण मला स्पष्ट करायचे आहे की हे एक सामाजिक व्यासपीठ आहे. ही काही निवडणुकीसाठीची खेळी नाही. आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा देत नाही. पंजाबच्या हक्कांसाठी आमच्यासोबत लढणाऱ्या सर्वांसाठीच, मग ते हिंदू, मुस्लीम, शीख किंवा ख्रिश्चन कोणीही असोत, ही संघटना आहे. 1947 पूर्वी आम्ही एकोप्याने एकत्र राहत होतो, पण इंग्रजांनी आमच्याकडून तो बंधुभाव हिरावून घेतला. आमच्या गुरुंनी जातीवादाच्या विरोधात लढा दिला," असे सिद्धू यांनी संघटना स्थापनेवेळी म्हटले होते. ते पुढे म्हणाले, "1947 नंतरही पंजाबमध्ये काहीही बदलले नाही आणि आमचे सांस्कृतिक अवकाश दिल्लीने आम्हाला परत दिले नाही. ही संघटना दीप सिद्धूची नाही, तर पंजाबच्या हक्कांची आहे. लढा सत्तेविरुद्ध आहे... पंजाबींचा मानसिक नरसंहार अजूनही सुरू आहे. लोकांसाठी शिक्षण आणि आरोग्य परवडण्याजोगे बनवण्यापासून ते पंजाबची भाषा, संस्कृती आणि हक्कांचे संरक्षण आणि श्री गुरू ग्रंथसाहिब बद्दल आदर पुनःप्रस्थापित करण्यापर्यंत... आम्ही प्रत्येक गोष्टीसाठी लढू."*

सिद्धूच्या मते पंजाबच्या तथाकथित मागे पडलेल्या विकासाचे कारण अगोदर इंग्रजांनी आणि नंतर भारतीय राज्यसत्तेने केलेले दमन होते. पंजाबच्या एका "सुवर्ण" काळाची कल्पना ज्यामध्ये सर्व लोक "गुण्यागोविंदाने" राहत होते, आणि जो शीख धर्माच्या तत्त्वांनुसार चालत होता, पंजाबी भांडवलदार वर्गाच्या एका हिश्श्याला नेहमीच आकर्षक वाटत आली आहे. याच तत्त्वाला पुढे नेत, सिद्धूने जाहीर केले की त्याची संघटना फक्त अशाच पक्षाला समर्थन देईल जो पंजाबच्या अधिकारांबद्दल बोलेल, आणि त्यानुसार त्यांनी सिमरनजित सिंह यांच्या खलिस्तानसमर्थक पक्ष असलेल्या शिरोमणी अकाली दल (अमृतसर)ला पाठिंबा सुद्धा दिला. हे सिमरनजित सिंह मान तेच आहेत ज्यांनी शहीद भगतसिंहाला एक "किरकोळ दहशतवादी" म्हटले होते आणि जलियनवाला बाग हत्याकांड घडवणाऱ्या जनरल डायरला त्यांचे आजोबा अरुर सिंह यांनी सुवर्ण मंदिरात चढवलेल्या सरोप्याचे सुद्धा समर्थन केले होते! फेब्रुवारी 2022 मध्ये सिद्धूचा कार अपघातात मृत्यू झाला. 4 मार्च रोजी सिमरनजित सिंह मान यांनी अमृतपाल सिंह यांची "वारिस पंजाब दे" चे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा केली. परंतु तोपर्यंत अमृतपाल सिंह कोण आहे हे जवळपास कोणालाच माहीत नव्हते!

### अमृतपाल सिंह यांचे आगमन

अमृतपालच्या जीवनाचे चरित्रात्मक तपशील अद्याप पुरेसे उपलब्ध नाहीत. हे माहीत आहे की त्याचा जन्म 1993 मध्ये झाला होता, त्याने पॉलिटेक्निकमधून पदवी प्राप्त केली होती आणि आपल्या कुटुंबाचा वाहतूक व्यवसाय व्यवस्थापित करण्यासाठी दुबईला स्थलांतरित झाला होता. तो त्याच्या सोशल मीडिया प्रोफाईलवर पंजाबशी संबंधित समस्यांबद्दल पोस्ट करत असे, परंतु त्यात फारसा धार्मिक स्वर नव्हता. त्या काळातील त्याचे अनेकदा केस कापलेले, कॅज्युअल टी-शर्ट आणि डेनिम्स घातलेले फोटो सुद्धा आहेत.

शेतकरी आंदोलन सुरू झाल्यावर अमृतपाल सोशल मीडियावर अधिक बोलका झाला आणि त्याचे फॉलोअर्स वाढू लागले. लवकरच, तो दीप सिद्धूचा अनुयायी आणि उघड समर्थक बनला. सिद्धूचा फेसबुक फॉलोअर होण्यापासून त्याच्या संघटनेच्या (एका विभाजित गटाचा) प्रमुख होण्यापर्यंत अमृतपालचा प्रवास अद्याप अस्पष्ट आहे. "वारिस पंजाब दे" चा प्रमुख म्हणून नाव जाहीर झाल्यानंतर दोन दिवसांनी एका अल्पज्ञात युट्युब चॅनेलला दिलेल्या त्याच्या पहिल्या मुलाखतीत, त्याने पंजाबवरील भारताच्या "वसाहतिक राजवटीला" सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हटले आणि पंजाबची स्थिती "गुलामगिरी" सारखीच आहे असेही म्हटले. पाच महिन्यांनंतर, त्याने सुवर्ण मंदिराला भेट दिली, जिथे त्याला अकाल तख्त येथे सरोपा पोशाख देण्यात आला, जो सहसा सन्मानित पाहुण्यांसाठी किंवा शीख समुदायासाठी काही स्वरूपात योगदान दिलेल्यांसाठी राखीव उच्च सन्मान असतो.

या असामान्य सत्कारात हे स्पष्ट होते की अमृतपालला काही शक्तिशाली हितसंबंधांचे, म्हणजेच भांडवलदार वर्गाच्या एका हिश्श्याचे, समर्थन प्राप्त आहे. पुढचा महिना सिद्धूने उभ्या केलेल्या कामापर्यंत पोहोचण्यात आणि राजकीय आणि धार्मिक नेत्यांना भेटण्यात अमृतपालने वेळ घालवला. अमृतपालचे समर्थन करणाऱ्या तरुणांमध्ये मोठ्या संख्येने शेतकरी आंदोलनात सक्रिय सहभाग घेणारे युवक आहेत. डिसेंबर 2021 मध्ये निदर्शने आटोपल्यानंतर आणि सिद्धूच्या निधनानंतर, आंदोलनाच्या नेतृत्वाने किंवा मुख्य प्रवाहातील राजकारण्यांनी पंजाबी तरुणांच्या चिंतेकडे लक्ष देण्याची पर्वा केली नाही. ती पोकळी भरून काढण्यासाठी अमृतपाल पुढे आला.

त्याने या कालावधीचा उपयोग स्वत:ची एका धर्माभिमानी शिखाच्या रूपात प्रतिमा निर्माण करण्यासाठी केला. अगदी सुरुवातीपासूनच, त्याने हे स्पष्ट केले की तो स्वतःला राजकीय वर्णपटाच्या धार्मिक मूलगामी टोकाला उभा करत आहे आणि सनातनी शीख धर्माचे समर्थन करत आहे. पंजाबमधील गुरुद्वारांमध्ये खलिस्तानी अतिरेक्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आयोजित कार्यक्रमांमध्ये त्याने सार्वजनिकपणे हजेरी लावायला सुरुवात केली. सप्टेंबरमध्ये अमृतपालने राज्यभरात अनेक ठिकाणी अमृत प्रचार मोहीम सुरू केली. अमृत, म्हणजे पवित्र पाणी, स्वीकारणे शीख धर्मात प्रवेश घेण्याची प्रक्रिया आहे आणि त्यात विशिष्ट आचारसंहिता आणि जीवनशैलीचे पालन करणे समाविष्ट आहे. अमृत प्रचार मोहिमा हे भिंद्रनवाले यांनी जनप्रसाराकरिता वापरलेले प्रभावी साधन होते. 25 सप्टेंबर रोजी अमृतपालने स्वत: शेकडो लोकांसह दीक्षा घेतली. सर्वोच्च शीख धार्मिक संस्था असलेल्या शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती(एस.जी.पी.सी.)ने आनंदपूर साहिब येथे अमृतपालच्या आवाहनाला मान्यता दिली आणि त्यांच्या मोहिमांना रसद सुद्धा पुरवली.

### भिंद्रनवालेचे अनुकरण

त्या महिन्याच्या शेवटी अमृतपालच्या स्थानाची खरी घोषणा झाली. त्या दिवशी, अमृतपालने दस्तरबंदीमध्ये भाग घेतला. दस्तरबंदी म्हणजे एक पगडी बांधण्याचा समारंभ ज्यात कुटुंबाच्या किंवा कुळाच्या प्रमुखाला अभिषेक केला जातो. "वारिस पंजाब दे" च्या फुटलेल्या गटाचा अधिकृत ताबा या कार्यक्रमानंतर अमृतपालकडे आला. हा कार्यक्रम मोगा जिल्ह्यातील रोडे गावात मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आला होता. रोडे हे भिंद्रनवाले यांचे मूळगाव होते, हे सुद्धा महत्त्वाचे आहे. या कार्यक्रमाला हजारोंची उपस्थिती होती. "खलिस्तान झिंदाबाद!" च्या घोषणा चालू असताना अमृतपाल स्टेजवर गेला. त्यांनी भिंद्रनवाले यांना "प्रेरणा" म्हटले आणि खलिस्तानच्या स्थापनेची मागणी केली. अमृतपाल म्हणाला की शीख "गुलामांचा समुदाय बनले आहेत" आणि जमावाने हे लक्षात ठेवले पाहिजे की रोडे हे ठिकाण होते जेथे "पंथाच्या स्वातंत्र्या"साठी लढा सुरू झाला होता. या कार्यक्रमात मंजूर झालेल्या ठरावात केंद्र आणि राज्य सरकारांकडे भारत आणि परदेशात "खलिस्तानसाठी शांततापूर्ण लढा" देणाऱ्या, तरुणांना ताब्यात घेणे किंवा त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे टाळण्याची मागणी केली गेली. निषेधाच्या छोट्या सुराविरोधात सुद्धा कारवाई करण्यास उत्सुक असलेले भाजप सरकार मात्र यावेळी शांत बसून होते.

रोडे गावातील कार्यक्रमात भिंद्रनवालेच्याच भाषेत अमृतपालने उत्तरप्रदेश व बिहारमधून आलेल्या हिंदू प्रवासी कामगारांवर सुद्धा निशाणा साधला आणि त्यांना पंजाबमध्ये ड्रग्स व सिगरेट विकण्यासाठी, ज्यावर शीख धर्मात मनाई आहे, दोषी ठरवले. "जर तुमच्या गावात असे काही होऊ नये असे वाटत असेल, तर कृती करा" असे त्याने आवाहन केले. नंतरच्या भाषणांमध्ये त्याने शिखांनी "बाहेरच्यांना" जमिनी विकू नयेत असेही आवाहन केले. याचवेळी अमृतपालने राज्यातील ख्रिश्चन समुदायावर सुद्धा निशाणा साधणे सुरू केले, आणि गावातील नागरिकांना आवाहन केले की गावांच्या प्रवेशद्वारावर बोर्ड लावून ख्रिश्चन धर्मगुरूंच्या प्रवेशावर निर्बंध घालावेत. परप्रांतीय, परधर्मीय यांना निशाणा बनवणे आणि खोटा शत्रू निर्माण करणे हे अशाप्रकारच्या उजव्या विचारसरणींचे वैशिष्ट्य आपल्याला खलिस्तानच्या चळवळीतही दिसून

पान 8 वर

## क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 4

# सामाजिक वरकडाच्या उत्पादनाची सुरुवात आणि सामाजिक श्रम विभाजन व वर्गांचा उदय

✍अभिनव

भांडवली समाजातील भांडवलदार वर्गाच्या नफ्याचा स्रोत आणि कामगार वर्गाचे शोषण समजून घेण्यासाठी आपल्याला सामाजिक अधिशेष (सामाजिक वरकड), सामाजिक श्रम विभाजन आणि वर्गांचा उदय यासारख्या इतर काही गोष्टी समजून घ्याव्या लागतील. या गोष्टी समजून घेतल्यामुळे कामगार वर्गाचे शोषण आणि भांडवलदार वर्गाच्या नफ्याचा स्रोत समजून घेणे आपल्याला सोपे होईल. त्यामुळे आपण या मूलभूत संकल्पनांसह सुरुवात करूयात.

आदिम काळात जेव्हा माणूस टोळ्यांमध्ये राहत होता तेव्हा त्याच्या उत्पादक शक्तींच्या विकासाची पातळी खूप कमी होती. अजून शेतीची सुरुवात झाली नव्हती आणि मानवी टोळ्या जेमतेम तेवढ्याच गोष्टी गोळा करू शकत होत्या आणि तेवढीच शिकार करू शकत होत्या जेवढी त्यांच्या अस्तित्वासाठी आवश्यक होती. कंदमूळ गोळा करणाऱ्या आणि शिकारीवर अवलंबून असणाऱ्या समाजाच्या काळात अनिश्चिततेचे प्रमाण जास्त होते कारण या आदिम जमातींना जगण्यासाठी पुरेसे अन्न मिळू शकेल का याची कधीच खात्री नसायची. माणूस अजूनही निसर्गाच्या आंधळ्या शक्तींचा गुलाम होता. आपण त्यांना निसर्गाच्या आंधळ्या शक्ती म्हणतो कारण त्यामागे काम करणारा कार्यकारणभाव माणसाला अजून समजला नव्हता. निसर्गाच्या शक्तींमागील कारणे म्हणजेच निसर्गाच्या गतीचे नियम समजून घेण्यासोबतच मनुष्य स्वतंत्र होत गेला कारण आता तो निसर्गाच्या शक्तींबद्दलच्या त्याच्या वाढत्या आकलनानुसार निसर्गात त्याच्या गरजेप्रमाणे परिवर्तन करू शकत होता. ही समज माणसाच्या स्वतःच्या सामाजिक व्यवहारातून, म्हणजे उत्पादनासाठी माणसाच्या संघर्षातून आणि वैज्ञानिक प्रयोगातून विकसित झाली.

तथापि, आदिम टोळी समाजाच्या युगात मनुष्य अजूनही केवळ निसर्गाने दिलेलेच प्राप्त करत होता, परंतु तो अद्याप जाणीवपूर्वक आणि नियोजनबद्ध पद्धतीने निसर्गात बदल घडवून वा हस्तक्षेप करून काही तयार करत नव्हता, म्हणजेच तो उत्पादन करत नव्हता, कारण निसर्गाबद्दलचे त्याचे ज्ञान अजूनही अत्यंत अविकसित टप्प्यात होते. त्यामुळे ह्या आदिम जमाती अथवा टोळ्या कंदमुळे गोळा करून किंवा शिकार करून जेवढे आणि जे काही मिळवू शकत होते त्यात नेहमी एक अनिश्चितता असायची आणि आवश्यकतेपेक्षा जास्त ते क्वचितच मिळवू शकायचे. त्यामुळे टोळीतील सर्व लोकांनी जीवनासाठीच्या संघर्षाच्या या कामात गुंतून राहणे आवश्यक होते आणि समाजात श्रमविभागणी व कोणत्याही प्रकारची उच्च-नीच विभागणी होणे शक्यच नव्हते. तोपर्यंत श्रमांची केवळ लिंग आधारित आणि वयानुसार विभागणीच असू शकत होती, जी जैविक वैशिष्ट्यांमुळे झालेली विभागणी होती, ना की अतिरिक्त उत्पादनाच्या निर्मितीसह अस्तित्वात आलेली श्रमांची सामाजिक विभागणी. आदिम जमातीमध्ये शिकार इत्यादी कामांमध्ये शारीरिक किंवा मानसिक क्षमतेच्या आधारावर नेतृत्वाची भूमिका काही व्यक्तींना दिली जायची, परंतु या व्यक्तींना कोणताही विशेषाधिकार नसायचा. म्हणजे यामुळे हे लोक जास्त अन्न घेऊ शकत नव्हते. नेतृत्वाची जबाबदारी ही इतर जबाबदाऱ्यांसारखीच एक जबाबदारी होती. परंतु ज्याअर्थी या आदिम टोळ्या त्यांचे जीवनमान किमान स्तरावर टिकवून ठेवण्याइतपतच अन्न आणि संसाधने कसेबसे मिळवू शकत होत्या, त्यामुळे जर एखाद्या व्यक्तीने त्याच्या किमान गरजेपेक्षा जास्त हडप करण्याचा प्रयत्न केलाच, तर त्यामुळे टोळीचे अस्तित्वच धोक्यात आले असते आणि टोळी फुटली असती. त्यामुळे टोळी समाज हा एक प्रकारचा आदिम साम्यवादी समाज होता, ज्यात एकप्रकारे अभाव आणि अज्ञानाने लादलेली समानता होती.

नवपाषाण युगात, सुमारे 12,000 वर्षांपूर्वी, सध्याच्या अरब जगाच्या (पॅलेस्टाईन, सीरिया, लेबनॉन इ.) काही भागांमध्ये सर्वप्रथम शेतीची सुरुवात झाली. शेतीच्या माध्यमातून प्रथमच माणसाने निसर्गाने जे काही दिले ते जसेच्या तसे घेण्याऐवजी, निसर्गाला बदलून आपल्या गरजेनुसार गोष्टी तयार करण्यासाठी सुरुवात केली. शेकडो वर्षांत विकसित झालेल्या निसर्गाबद्दलच्या माणसाच्या ज्ञानामुळेच शेतीची सुरुवात झाली. यासोबतच, माणसाच्या निसर्गाच्या आकलनात आणि गरजेनुसार त्यात बदल करण्याच्या त्याच्या सामर्थ्यामध्ये गुणात्मक बदल झाला. दुसऱ्या शब्दांत, त्याच्या उत्पादक शक्तींचा गुणात्मक विकास झाला. समाजातील प्रत्येक नवीन टप्पा शेवटी उत्पादक शक्तींमधल्या गुणात्मक बदलांसह येत असतो, मात्र ही प्रक्रिया स्वतःहून घडत नाही तर माणसाचा सामाजिक व्यवहार त्यात मध्यवर्ती भूमिका बजावतो. नवपाषाण युगात एक क्रांती घडली, ज्यामुळे माणूस त्याच्या सामाजिक विकासाच्या नवीन टप्प्यावर जाण्यासाठी तयार झाला. शेतीच्या प्रारंभामुळे मनुष्याने प्रथमच त्याच्या किमान भौतिक गरजेपेक्षा वरकड उत्पादन करू शकण्याची पूर्वअट पूर्ण झाली. पण याचा अर्थ शेतीच्या सुरुवातीबरोबरच अतिरिक्त उत्पादनही सुरू झाले असा नव्हे. शेती सुरू झाल्यानंतरही आदिम जमाती दीर्घकाळ भटके शिकारी आणि कंद-मूळ गोळा करणारे म्हणून जगत राहिल्या आणि केवळ शेतीच्या विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर या जमाती भटक्या जीवनाचा मार्ग सोडून काही विशिष्ट भागात स्थायिक होऊ लागल्या. एका दीर्घ प्रक्रियेत कृषी उत्पादन समाजाच्या किमान गरजेपेक्षा जास्त उत्पादन करण्याच्या स्थितीत पोहोचले.

पण ही परिस्थिती येताच टोळी समाजाच्या सामुदायिक आणि सामूहिक जीवनाच्या अंताची सुरुवात झाली. कारण जेव्हा अतिरिक्त सामाजिक उत्पादन अस्तित्वात येते तेव्हाच या अतिरिक्त सामाजिक उत्पादनाच्या ताब्यासाठी संघर्ष सुरू होतो. म्हणजेच जेव्हा समाजातील मानवाच्या उत्पादक शक्तींचा विकास अशा पातळीवर पोहोचतो की ते नियमितपणे त्यांच्या किमान गरजेपेक्षा जास्त उत्पादन करू लागतात, तेव्हा हे अतिरिक्त उत्पादन बळकावण्याचा झगडाही सुरू होतो. टोळी समाजात पूर्वी अस्तित्वात असलेली सामुदायिकता आणि सामूहिकता टंचाईच्या परिस्थितीमुळे आणि निसर्गाबद्दलची समजदारी अगदी आदिम पातळीवर असण्याच्या स्थितीने लादलेली होती. पण त्यामुळे समाजात उच्च-नीच भेट नव्हता, शोषण-दडपशाही नव्हती आणि समता होती. म्हणून जेव्हा मानवाच्या उत्पादक शक्तींच्या विकासाबरोबर सामुदायिक आदिम समाजाचा ऱ्हास झाला तेव्हा ती गुलामगिरी, अधीनता आणि शोषणाला जन्म देणारी एक वेदनादायक प्रक्रिया होती. पण ऐतिहासिकदृष्ट्या ते एक पुढचे पाऊल होते. या अतिरिक्त उत्पादनाशिवाय समाजात ना कारागीर तयार होऊ शकले असते, ना शेतकरी, ना कलाकार, ना शास्त्रज्ञ, ना तत्त्वज्ञ-विचारवंत निर्माण होऊ शकले असते. त्याशिवाय माणूस निसर्गाच्या आंधळ्या शक्तींचा गुलाम बनून राहिला असता, असुरक्षितता, अभाव आणि अनिश्चिततेत आपले जीवन जगत राहिला असता. म्हणूनच ऐतिहासिकदृष्ट्या उत्पादक शक्तींच्या विकासासह आदिम टोळी समाजाचे विघटन आणि पहिल्या वर्ग समाजाचा उदय ही ऐतिहासिकदृष्ट्या एक प्रगतीशील घटना होती, जेव्हा की तात्कालिकदृष्ट्या यामुळे आदिम समाजाची ओळख असलेल्या सामुदायिकता आणि सामूहिकतेच्या भावनेचे विघटन झाले. आणि तसाही इतिहासाचा प्रवास इथेच थांबणारा नव्हता. त्याला टंचाईतून लादलेल्या सामूहिकतेकडून विपुलतेतून जन्माला आलेल्या उन्नत आणि सजग सामूहिकतेकडे, म्हणजेच समाजवादाच्या संक्रमणातून जात साम्यवादाकडे जाणे आवश्यक आहे, कारण समाजाचे ज्ञान आपल्याला सांगते की कुणाच्याही इच्छेपासून स्वतंत्र अशी ही समाजाच्या गतीची दिशा आहे, जे आपण तथ्ये आणि पुराव्यांसह पुढे पाहू.

तथापि, जेव्हा समाजात अतिरिक्त उत्पादन शक्य होते, तेव्हा समाजाचे एकूण श्रम केवळ अनिवार्य किंवा आवश्यक श्रमाच्या श्रेणीत येत नाही. आवश्यक श्रम म्हणजे ते श्रम जे समाजातील लोकांच्या किमान भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक किंवा अनिवार्य आहे. आता जेव्हा समाजातील उत्पादक शक्तींचा विकास यापेक्षा उच्च पातळीवर पोहोचला आहे, तेव्हा हे उघड आहे की या आवश्यक श्रमाव्यतिरिक्त समाजातील लोक अतिरिक्त श्रम देखील करत आहेत, जे किमान गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या उत्पादनाच्या वर अतिरिक्त उत्पादन किंवा सामाजिक अधिशेष निर्माण करत आहे. हे अतिरिक्त श्रम समाजाच्या एका हिश्श्याला उत्पादक श्रमात सहभागी होण्याच्या आणि उत्पादनात भाग घेण्याच्या अनिवार्यतेतून मुक्त करू शकते आणि शेवटी अपरिहार्यपणे असेच करते सुद्धा. जे लोक टोळी समाजात किंवा कुठल्याही सामुदायिक समाजात नेतृत्वाची भूमिका बजावत होते किंवा कुठल्याही रूपात विशिष्ट भूमिकेत होते, त्यांनी या वरकड उत्पादनावर कब्जा करण्यास सुरुवात केली. उदाहरणार्थ काही सभ्यतांमध्ये सुरुवातीला टोळी प्रमुख किंवा प्रधानांनी धान्य कोठारांच्या संरक्षकांची भूमिका बजावण्यास सुरुवात केली. पुढे ते त्याचे मालक बनून बसले. तसेच अन्य काही ठिकाणी या अतिरिक्त उत्पादनावर हिंसक मार्गाने कब्जा करण्यात आला. या सामाजिक अधिशेषाच्या निर्मितीनेच समाजातील सत्ताधारी वर्गांना जन्म दिला. ही प्रक्रिया शेकडो वर्षांमध्ये चालली आणि आदिम टोळी समाजाचे विघटन झाले. यासोबतच वर्ग समाज अस्तित्वात आला.

हा टप्पा आल्यानंतर समाजातील उत्पादक श्रम दोन भागात विभागले जाऊ शकतात: अनिवार्य श्रम आणि अतिरिक्त श्रम. अनिवार्य श्रमाने उत्पादित केलेले उत्पादन हे उत्पादक वर्गाच्या उपजीविकेसाठी आवश्यक असलेले उत्पादन आहे आणि त्याला आवश्यक किंवा अनिवार्य उत्पादन म्हणता येईल. जेव्हा की उत्पादक वर्ग जे अतिरिक्त श्रम करतात त्यातून वरकड किंवा अतिरिक्त उत्पादन तयार होते, जे शासक वर्गाद्वारे हडप केल्या जाते.

उदाहरणार्थ, भारतातील प्राचीन सोळा जनपदांच्या कालखंडापूर्वी म्हणजे वैदिक कालखंडाच्या उत्तरार्धात, आजपासून सुमारे तीन हजार वर्षांपूर्वी कृषी उत्पादन करणाऱ्यांच्या टोळी सरदारांनी आणि सुरु होत असलेल्या राज्यसत्तेला चालवणाऱ्यांनी 'स्वैच्छिक कर' घेण्याची सुरुवात केली होती. भारतातील हा काळ लोखंडाच्या वापराने गंगेच्या मैदानातून जंगले साफ करण्याचा काळ होता. याच काळात सुपीक गंगेच्या मैदानात लागवडीचा विस्तार होत होता आणि अतिरिक्त उत्पादन वाढत होते. या काळात बलि नावाच्या 'स्वैच्छिक करांची' सुरुवात झाली, जे प्रत्यक्ष कृषी उत्पादकांना अनिवार्यतः शासक वर्गांना द्यावे लागायचे. नंतर त्याचे अनिवार्य कर प्रणालीमध्ये रूपांतर झाले. आजपासून सुमारे 2,600 वर्षांपूर्वी गंगेच्या मैदानात उदयास आलेल्या या सोळा राज्यांमध्ये, राज्यसत्ता आणि सत्ताधारी वर्ग या लगान आणि करांच्या माध्यमातून प्रत्यक्ष उत्पादकांचे अतिरिक्त श्रम हिसकावूनच आपले अस्तित्व टिकवू शकले. या शासक वर्गांच्या आश्रयानेच समाजातील तत्कालीन बौद्धिक वर्ग, म्हणजे कलाकार, नाटककार, तत्त्वज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, शास्त्रज्ञ, गणितज्ञ, इ. अस्तित्वात आला, जो सामान्यतः शासक वर्गाच्या सेवेत गुंतला होता. तसेच असेही बुद्धिजीवी तयार झाले जे भौतिकवादी होते, सर्वत्र सत्ताधारी वर्गाच्या भूमिकेत असणाऱ्या ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या वर्चस्वाला आव्हान देत होते, आणि त्याच वेळी जनतेची बाजू घेत होते. परंतु असे बुद्धिजीवी सुद्धा समाजात सामाजिक अतिरिक्त उत्पादन व सामाजिक वर्गविभागणी निर्माण झाल्याशिवाय तयार होऊ शकले नसते. तथापि, जसजशी लगान आणि करांची ही संपूर्ण प्रणाली विकसित होत गेली तसतसे या शासक वर्गाने कारागीरांवरही कर लावणे सुरु केले. बलि, भाग, कर इत्यादी नावाने असे विविध लगान आणि कर आता प्रत्यक्ष उत्पादक लोकांकडून वसूल केले जात होते. या सोळा जनपदांपैकी एकाचा म्हणजेच मगधचा विस्तार झाल्याने मौर्य साम्राज्याच्या जन्मासाठी जमीन तयार झाली. मौर्य साम्राज्य हा पहिला राजवंश होता आणि तो जन्माला आल्यानंतर राज्यसत्तेचा आणखी विस्तार झाला. प्रथमच कायमस्वरूपी सैन्य आणि नोकरशाही अस्तित्वात आली, जमीन महसूल व्यवस्था सुरळीत झाली, एकसमान मापे आणि वजने परिभाषित केली गेली, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य आणि कला यांचा विकास एका नवीन स्तरावर पोहोचला आणि यासह सत्ताधारी वर्ग आणि त्यांच्या सेवेत जोडलेल्या मध्यमवर्गीय बुद्धिजीवी, कलाकार इत्यादींचा

पान 7 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 4

पान 6 वरून

वर्ग विस्तारला. या काळात उत्पादकतेतही मोठी वाढ झाली. गुलामी काम यापूर्वीच अस्तित्वात आले होते, परंतु भारतीय इतिहासात प्रथमच गुलामांचा घरगुती कामांसाठी वापर करण्यासोबतच त्यांना उत्पादक कामांमध्येही लावले गेले. सरकारी मालकीच्या जमिनीवर (ज्याला मौर्य काळात सीता भूमी म्हणून ओळखल्या जायचे) मुक्त शेतकऱ्यांना जमिनीचे भूखंड वाटप करण्याबरोबरच गुलामांच्या श्रमावर सुद्धा शेती केली जायची. याबरोबरच अतिरिक्त श्रम आणि त्याच्या अतिरिक्त उत्पादनाला प्रत्यक्ष उत्पादकांकडून हडप करण्याच्या पद्धतीही विस्तारल्या. नव-नवे कर, लगान इत्यादींद्वारे अतिरिक्त उत्पादन सत्ताधारी वर्ग हडप करू लागला. भारतीय इतिहासात आपण सामाजिक अधिशेषाच्या जन्माची, वर्ण (जो त्याच्या जन्माच्या वेळी वर्गच होता) तयार होण्याची व राज्यसत्तेचा जन्म होण्याची पूर्ण प्रक्रिया स्पष्टपणे पाहू शकतो.

वास्तवात, शासक वर्ग अतिरिक्त श्रम आणि त्यातून निर्माण होणारे अतिरिक्त उत्पादन कुठल्या पद्धतीने हडप करतो, यावरूनच समाज विकासाच्या कुठल्या टप्प्यावर आहे हे ठरते. उदाहरणार्थ, भांडवलशाहीच्या आधीच्या सामाजिक व्यवस्थेबद्दल बोलायचे झाल्यास, अतिरिक्त श्रम कुठल्यातरी आर्थिकेतर मार्गाने, म्हणजे शासकीय नियम-कायदे, धर्म, सामाजिक परंपरा इत्यादींच्या आधारावर वसूल केले जात होते. उदाहरणार्थ, जातक कथांवरून माहीत पडते की सोळा जनपदांच्या काळात धार्मिक ग्रंथांमध्ये असे नियम-कायदे लिहिले गेले होते ज्यानुसार शेतकरी, (जे त्यावेळी प्रामुख्याने वैश्य वर्णाच्या लोकसंख्येतून येत होते) अधिनस्थ मजूर आणि गुलामांना (जे त्यावेळी प्रामुख्याने शूद्र जातीतून यायचे) काही विशिष्ट कर, लगान द्यावे लागत होते, जे न दिल्यास त्यांना शिक्षा केली जायची. तसेच अनेक कर होते जे सत्ताधारी वर्ग जबरदस्तीने वसूल करायचे, जसे की टुंडिया आणि अकासिया कर अधिकाऱ्यांद्वारे जबरदस्तीने गोळा केले जायचे. त्याचप्रमाणे कारागीर, अधीनस्थ मजूर यांना महिन्यातील ठराविक दिवशी राजा आणि सत्ताधारी वर्गाच्या लोकांसाठी काम करावे लागत असे. म्हणजे आर्थिकेतर बळजबरीद्वारे भूदास, अवलंबित शेतकरी, कारागीर इत्यादींच्या अतिरिक्त श्रमाला आणि त्याच्या अतिरिक्त उत्पादनाला शासक वर्ग आणि त्याच्या राज्यसत्तेद्वारे हडप केले जायचे. काही ठिकाणी ते श्रम लगान किंवा श्रम कराच्या रूपात असायचे, जसे की आठवड्याच्या किंवा महिन्याच्या ठराविक दिवसांसाठी प्रत्यक्ष उत्पादकांना शासक वर्गासाठी विनामूल्य काम करावे लागत होते, त्या बदल्यात त्यांना काहीही मिळत नव्हते. त्याचप्रमाणे हे उत्पादनाचे स्वरूप घेऊ शकते. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाच्या एक तृतीयांश किंवा एक चतुर्थांश हिस्सा राजा किंवा जमीन मालकाला द्यावा लागायचा. त्या काळात ब्राह्मण-क्षत्रिय वर्ण मिळून सत्ताधारी वर्ग बनला होता. आणि नंतरच्या काळात लगान अथवा कराने पैशाचेसुद्धा रूप घेतले, त्यानुसार प्रत्यक्ष उत्पादकाला पैशात निश्चित कर किंवा लगान द्यावे लागायचे. भांडवलशाहीपूर्व काळातील सर्व वर्गव्यवस्था, मग तो गुलाम समाज असो, मौर्य काळातील शूद्र आणि वैश्य जातींच्या प्रत्यक्ष उत्पादकांच्या श्रमावर आधारित शेती अर्थव्यवस्था असो किंवा गुप्तकाळापासून सुरू झालेली भारतीय सरंजामशाही व्यवस्था असो, सुल्तनत काळ आणि नंतर मुघल काळातील निरंकुश सरंजामशाही व्यवस्था असो. वसाहतवादाच्या काळातही खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांकडून आर्थिकेतर बळजबरी करून आर्थिक वरकड वसूल करण्याची पद्धत ब्रिटिश वसाहतवाद्यांनी बदलली नाही, तर स्वत: त्यात सर्वोच्च स्थानी बसून जहागिरदार, जमिनदारांना स्वतःच्या हाताखाली करून घेतले.

वरील उदाहरणांवरून आपण अतिरिक्त श्रम आणि आवश्यक किंवा अनिवार्य श्रम या संकल्पना समजू शकतो. मौर्य राजवंशाच्या राजवटीत जेव्हा एखादा आश्रित किंवा अधीनस्थ शेतकरी आपल्या भूखंडावर तीन दिवस शेती करायचा आणि चार दिवस तो जमीनदार किंवा राज्याच्या सीता भूमी वर शेती करायचा, तेव्हा पहिले तीन दिवस तो आवश्यक किंवा अनिवार्य श्रम करायचा जे त्याच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक होते, तर पुढचे चार दिवस तो सत्ताधारी वर्गासाठी कोणत्याही मोबदल्याशिवाय अतिरिक्त श्रम करीत असे, ज्याच्या बळावर सत्ताधारी वर्गाची राज्यसत्ता, त्यांची ऐयाशी, त्यांच्यावर अवलंबित बुद्धिजीवी व कारकून वर्गाचे जीवन चालायचे. त्याचप्रमाणे सोळा जनपदांच्या काळात जेव्हा कारागिराला महिन्यातील चार दिवस राजासाठी नियमित काम करावे लागत असे, तेव्हा ते त्याचे अतिरिक्त श्रम होते, जे त्याच्याकडून धार्मिक आणि राज्याच्या नियम-कायद्यांद्वारे वसूल केले जात होते. सर्वसाधारणपणे सांगायचे तर, सामाजिक अतिरिक्त उत्पादन हा एकूण सामाजिक उत्पादनाचा तो भाग असतो जो आवश्यक उत्पादनापेक्षा जास्त असतो. आवश्यक उत्पादन म्हणजे खर्च केलेल्या श्रमशक्तीच्या (जी भांडवलशाहीपूर्व काळात माल बनलेली नसते) आणि उत्पादनाच्या साधनांच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक असलेले उत्पादन. सामाजिक अतिरिक्त उत्पादन सुद्धा आवश्यक उत्पादनाप्रमाणेच प्रत्यक्ष उत्पादक वर्गाद्वारे उत्पादित केले जाते, परंतु ज्याला शासक वर्गाद्वारे कुठल्या ना कुठल्या पद्धतीने आणि कुठल्या ना कुठल्या स्वरूपात हडप केले जाते. ही पद्धत आणि स्वरूप कुठलेही असू शकतात, जसे की श्रमाच्या स्वरूपात, श्रमाच्या उत्पादनाच्या स्वरूपात किंवा श्रमाचे उत्पादन विकून मिळवलेल्या पैशाच्या स्वरूपात.

भांडवलशाही समाजातील उद्योजकीय नफा, लगान, व्याज आणि व्यापारी नफ्याचे स्त्रोत असलेले अतिरिक्त मूल्य हे वास्तवात दुसरे काही नसून समाजातील प्रत्यक्ष उत्पादकांच्या, म्हणजे सर्वहारा वर्ग, लहान वस्तू उत्पादक जसे की कारागीर आणि छोट्या शेतकऱ्यांच्या अतिरिक्त श्रमातून तयार होणाऱ्या अतिरिक्त उत्पादनाचेच एक निश्चित स्वरूप असते. अतिरिक्त उत्पादनाचे हे निश्चित रूप म्हणजे मुद्रा (पैसा) रूप आहे, जे एका विशिष्ट पद्धतीने हडप केले जाते. ही पद्धत आर्थिकेतर बळजबरी, थेट हिंसाचार आणि जबरदस्तीवर आधारित नसून ती आर्थिक शोषणावर आधारित आहे. अतिरिक्त मूल्याची ही केवळ एक प्राथमिक व्याख्या आहे, ज्याची आपण नंतर तपशीलवार चर्चा करू. परंतु आता एवढे समजून घेणे आवश्यक आहे: अतिरिक्त मूल्य आणि त्याची नफा, भाडे, व्याज इत्यादी विविध प्रकारांमध्ये विभागणी हे दुसरे काही नसून प्रत्यक्ष उत्पादकांच्या श्रमाच्या उत्पादनाचा तो भाग आहे ज्याचा आपण अतिरिक्त उत्पादन किंवा सामाजिक अधिशेष उत्पादन म्हणून वर उल्लेख केला आहे. म्हणजे हे दुसरे काही नसून प्रत्यक्ष उत्पादकांच्या जीवनाचे उत्पादन आणि पुनरुत्पादन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या उत्पादनाच्या अतिरिक्त ते वरकड उत्पादन आहे ज्याच्या बळावर आजचा शासक वर्ग, म्हणजे भांडवलदार वर्ग, त्याचे सरकार, त्याची राज्यसत्ता, त्याची सेवा करणारे वर्ग टिकलेले आहेत आणि त्यांचे ऐशोआराम व ऐयाशी चालू आहे. हा उत्पादक वर्गाच्या श्रमाचा तो भाग आहे जे ते मालकांसाठी करतात, परंतु ज्यासाठी त्यांना कोणताही मोबदला किंवा मजुरी मिळत नाही. म्हणजेच, हे सामाजिक अधिशेष अथवा वरकड उत्पादन ते उत्पादन आहे जे प्रत्यक्ष उत्पादकाने उत्पादनाच्या साधनांच्या मालकांसाठी मोफत केलेल्या श्रमातून तयार होते.

त्यामुळे भांडवलदार वर्गाला प्राप्त होणारे अतिरिक्त मूल्य दुसरे काही नसून आर्थिक शोषणाच्या एका विशिष्ट पद्धतीने हडप केलेले अतिरिक्त उत्पादन होय, जे सामान्यतः पैशाचे रूप धारण करते, आणि जे कामगार वर्गाच्या त्या अतिरिक्त श्रमातून तयार होते ज्याच्या बदल्यात त्याला काहीही मिळत नाही आणि जे श्रम तो भांडवलदारांसाठी फुकटात करतो. फरक फक्त एवढाच आहे की एखाद्या गुलामाद्वारे किंवा सरंजामदारावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्याने केलेल्या अतिरिक्त श्रमाप्रमाणे हे स्पष्टपणे दिसत नाहीत. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पादनाचा काही भाग जबरदस्तीने घेतला जायचा किंवा दास वा भूदास स्वत:ला दिलेल्या जमिनीवर तीन दिवस काम करायचे आणि सत्ताधारी वर्गाच्या जमिनीवर चार दिवस अतिरिक्त श्रम करायचे. येथे अतिरिक्त श्रम आणि/किंवा अतिरिक्त उत्पादन ठिकाण आणि वेळेनुसार स्पष्टपणे वेगळे बघितले जाऊ शकते. पण भांडवलशाहीमध्ये अतिरिक्त उत्पादनाला हडप करण्याच्या या प्रक्रियेवर पडदा पडतो आणि तो लपतो. आता हे शोषण समजून घेण्यासाठी आपल्याला विश्लेषणाची गरज पडते आणि हेच विश्लेषण पहिल्यांदा कार्ल मार्क्सने केले आणि भांडवलशाही शोषणाचे घृणास्पद क्षुद्र रहस्य काय आहे हे दाखवून दिले. मार्क्सने ज्या सिद्धांताद्वारे भांडवलदार वर्गाच्या नफ्याचा स्रोत उघड केला, तो सिद्धांत आपण अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत म्हणून ओळखतो. पुढे आपण हा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत समजून घेऊ आणि भांडवलदार वर्ग आपल्याला कसे लुटतो, आपले शोषण कसे करतो हे जाणून घेऊ. पूर्वीच्या व्यवस्थांच्या उलट आज हे शोषण प्रत्यक्षपणे दिसत नाही त्यामुळे विश्लेषणाद्वारे त्याला समजून घ्यावे लागते. या विश्लेषणाची सुरुवात मालापासून होते, कारण मालच ती वस्तू आहे ज्यामध्ये भांडवलशाही समाजातील सर्व विरोधाभास भ्रूण स्वरूपात अस्तित्वात आहेत आणि माल स्वरूपातच भांडवलशाही समाजाच्या सर्व संपत्तीचा बहुसंख्य भाग अस्तित्वात आहे. भांडवलशाही समाजात, प्रत्येक वस्तू, प्रत्येक उत्पादन आणि प्रत्येक सेवा मालाचे रूप धारण करते, अगदी श्रमशक्ती म्हणजेच उत्पादकाची श्रम करण्याची क्षमता देखील मालामध्ये रूपांतरित होते. म्हणूनच भांडवलशाही समाजाच्या शास्त्रीय विश्लेषणाची सुरुवात मालापासूनच होऊ शकते.

(मूळ लेख- मजदूर बिगुल, सप्टेंबर 2022)

अनुवाद- जयवर्धन

## महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि धर्मवादाच्या विरोधात भगतसिंह जनअधिकार यात्रेचा पहिला टप्पा पूर्ण

पान 11 वरून

केली जावी. 'अग्निविर' योजना त्वरित रद्द करावी. जुनी पेन्शन योजना पूर्ववत करावी.

3. सर्व कामगार कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करावी, नवीन प्रस्तावित कामगार संहिता रद्द करण्यात याव्यात, 8 तास कामाचा दिवस, साप्ताहिक सुट्टी, दुप्पट दराने ओव्हरटाईम, युनियन बनवण्याचा अधिकार, सुरक्षेच्या तरतुदींचा अधिकार खात्रीने दिला जावा, अनौपचारिक क्षेत्रातील कारखाने सरकारी नियमांतर्गत आणले जावेत, नियमित स्वरूपाच्या कामांवरील कंत्राटी पद्धती रद्द करण्यात यावी, आणि कामगार कायद्यांच्या उल्लंघनास फौजदारी श्रेणीत आणून दंडनीय बनवावे.

4. महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी साठेबाजी, वायदा व्यापार आणि सट्टेबाजीवर बंदी घालण्यासाठी कायदा बनवला जावा, ज्याद्वारे हे दंडनीय गुन्हे घोषित केले जावेत, मूलभूत वस्तू आणि सेवांच्या वितरण प्रणालीचे राष्ट्रीयीकरण केले जावे आणि सरकारने त्याला पूर्णपणे आपल्या हातात घ्यावे, खाद्यान्नाच्या किमती वाढवणारी हमीभावाची व्यवस्था बंद करावी, सरकारी खरेदीसाठी सरासरी नफा निश्चित करणारी किंमत निर्धारित केली जावी आणि या खरेदी व्यवस्थेपर्यंत गरीब आणि अल्पभूधारक शेतकरी पोहोचू शकतील याची हमी दिली जावी, सार्वजनिक वितरण प्रणालीला सार्वत्रिक बनवून सर्व नागरिकांना अन्न उपलब्ध केले जावे.

5. महागाई कमी करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे अप्रत्यक्ष कर पूर्णपणे काढून टाकले जावेत आणि संपत्तीच्या आधारावर प्रगतीशील प्रत्यक्ष कर प्रणाली मजबूत केली जावी. आम्ही कामगार-कष्टकरी लोकांनी या देशात संपत्ती निर्माण करण्यात आमच्या मेहनतीने आधीच योगदान दिलेले असते. सरकार अप्रत्यक्ष कराच्या माध्यमातून आपली लूट करते. जर अप्रत्यक्ष कर नसतील तर पेट्रोल-डिझेल-स्वयंपाकाचा गॅस इत्यादींच्या किंमती लगेच अर्ध्या किंवा एक तृतीयांश एवढ्या कमी होतील आणि प्रत्येक जीवनावश्यक वस्तू आणि सेवा स्वस्त होतील. परंतु मोदी सरकार आणि त्याआधीची काँग्रेस सरकारे सातत्याने प्रत्यक्ष कर कमी करत आहेत, ज्याचा फायदा श्रीमंतांना होत आहे आणि अप्रत्यक्ष कर वाढवत आहेत, ज्यामुळे गरिबांचे सर्वाधिक नुकसान होत आहे.

6. शिक्षण हा मूलभूत अधिकार म्हणून संविधानात समाविष्ट केला जावा. लोकविरोधी नवीन शैक्षणिक धोरण–

पान 2 वर

# कोणताही अस्मितावाद हा कामगार वर्गाच्या विरोधातच आहे!

पान 5 वरून

येते. अमृतपालने भिंद्रनवालेंच्या अनेक कृतींची पुनरावृत्ती सुरू केली. पारंपरिक शीख वेश आणि बंदुका, कृपाण व स्टीलचे भाले धारण केलेल्या डझनावर पुरुषांच्या ताफ्यासहित फिरणे त्याने सुरू केले. त्याची भाषणे अधिकाधिक धर्मवादी आणि भेदभावपूर्ण होऊ लागली, ज्यांमध्ये खलिस्तानकरिता आवाहन आणि हिंसेच्या गर्भित धमक्या सामील होत्या. परिणामी त्याचे ट्विटर अकाउंट ऑक्टोबर मध्ये ब्लॉक केले गेले. त्याचे एक इंस्टाग्राम अकाऊंट डिसेंबर मध्ये ब्लॉक केले गेले, तर दुसरे अजनाला घटनेनंतर.

विटंबनेच्या एका कथित घटनेच्या विरोधातील निषेधात पोलिसांद्वारे मारल्या गेलेल्या दोन व्यक्तींच्या संदर्भातील एका सार्वजनिक सभेत अमृतपालने म्हटले की "आपण आपली शीख हुकूमत जाहीर केली पाहिजे. आपण दिडशे वर्षे गुलामी सहन केली आहे, अगोदर ब्रिटीशांची आणि नंतर हिंदुंची. आपण गुलाम मानसिकता बाळगून आहोत." अमृतपालच्या बोलण्याला प्रसिद्धी मिळत जाण्याचे एक कारण हे सुद्धा होते की त्याने खलिस्तानच्या मागणीच्या अगडबंब भाषणांसोबतच जनतेला आणि विशेषत: युवकांना छळणाऱ्या सामाजिक प्रश्नांना सुद्धा मिसळले, असे की: ड्रग्सची समस्या, पाणी समस्या, जमिनीचे वाद, दारूचे व्यसन, घरगुती हिंसाचार, शीख राजकीय कैदी, इत्यादी. अमृतपालचे ड्रग्स विरोधातील अभियान सुद्धा त्याच्या लोकप्रियतेचे एक कारण आहे. कॉंग्रेस आणि शिरोमणी अकाली दल या दोन्ही पक्षांना पंजाबमधील ड्रग्सच्या भीषण समस्येकरिता जबाबदार मानले जाते, आणि सध्याची सत्ताधारी 'आप'सुद्धा यात फार काही करताना दिसत नाही. यातून निर्माण झालेली पोकळी अमृतपाल सारखे भरून काढत आहेत. परंतु त्याने प्रत्येक प्रश्नाला राज्याबाहेरील येणाऱ्या कारणांशी किंवा प्रभावांशी जोडले. उदाहरणार्थ, जमिनीच्या वादांबद्दल आणि संसाधनांच्या कमतरतेबद्दल बोलताना त्याने "दिल्ली हुकूमती"ला जबाबदार ठरवले, ज्यांनी "बिहार, युपी, उत्तराखंड, हिमाचल मधून इतके भैया लोक पाठवले की शिखांची संख्या कमी पडू लागली आहे". हिंदीला निशाणा बनवत त्याने आपल्या अनुयायांना सांगितले की "त्यांनी अशा दुकानांमधून वस्तू घेऊ नयेत ज्यांचे नामफलक हिंदीत आहेत."

### अमृतपालची नजरकैद व अमृत प्रचार मोहीम

गेल्या वर्षी 4 नोव्हेंबर रोजी, शिवसेना (टकसली) (महाराष्ट्रातील शिवसेनेशी काही संबंध नाही) या हिंदु उजव्या विचारधारेच्या संघटनेच्या सुधीर सुरी या वादग्रस्त नेत्याची दिवसाढवळ्या गोळी मारून हत्या झाली. नंतर हे समोर आले की मारेकरी संदीप सिंह, जो खलिस्तानचा पाठीराखा आहे, तो अमृतपालला भेटला होता आणि त्याचे आशीर्वाद घेतले होते. स्थानिक मीडियाने सुद्धा या घटनेच्या बातम्या "हिंदु नेत्या" ची "शीख बंदूकधाऱ्या"कडून हत्या अशाच दिल्या. या घटनेनंतर काही काळ अमृतपालला पोलिसांनी नजरकैदेत ठेवले होते.

नजरकैद उठल्यावर लगेचच, 23 नोव्हेंबर रोजी अमृतपालने खालसा वहीरच्या पहिल्या टप्प्याला अमृतसर येथील सुवर्णमंदिरापासून सुरुवात केली. या अभियानात अमृत प्रचार आणि ड्रग्स-विरोधी अभियानाला एकत्र केले गेले. डझनावर जागी हे अभियान चालवले गेले. या अभियानातील अनेक व्हिडिओमध्ये अमृतपालचे शस्त्रधारी रक्षकांसोबत खलिस्तान-समर्थक नारे लावताना आणि शीख युवकांनी शस्त्र धारण करण्याचे आवाहन करतानाचे व्हिडिओ समोर आले. यानंतरच्या घटनाक्रमामध्ये सुरुवातीला उल्लेख केलेली अजनाला येथील घटना आणि अमृतपालची अटक घडून आले आहेत.

### अमृतपाल आता का यशस्वी होणार नाही

मोठया प्रयत्नांनतरही अमृतपालला पंजाबमध्ये मोठे जनसमर्थन मिळालेले नाही आणि पंजाबमधील कुलक वर्गातून येणारा त्याचा समर्थक हिस्साही छोटा होताना दिसत आहे. पंजाब प्रशासनावर त्याच्या संघटनेचे दमन करण्यासाठी असलेला दबाव, त्याच्या शेकडो समर्थकांची धरपकड आणि त्याच्या अभियानाच्या सुरुवातीलाच त्याच्यावर झालेली कारवाई हे दाखवतात की पंजाबमधील भांडवलदार वर्गाचा मोठा हिस्सा भारतीय राज्यसत्तेसोबत मजबुतीने उभा आहे आणि तीन शेती कायद्यांच्या आंदोलनातील घडामोडी सुद्धा दाखवतात की कृषी विरुद्ध औद्योगिक-वित्तीय भांडवलदारांच्या संघर्षात राज्यसत्ता निर्धाराने औद्योगिक-वित्तीय भांडवलदारांच्या बाजूने उभी आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी शीख धर्माची सर्वोच्च धर्मसंस्था असलेल्या अकाल तख्ताच्या प्रमुखांवर अमृतपालच्या व समर्थकांच्या सुटकेचे आवाहन केल्याबद्दल टीका केली. मान यांच्या अगोदर कोणत्याही मुख्यमंत्र्याने शीख समुदायाचा प्रवक्ता मानल्या जाणाऱ्या अकाल तख्ताच्या विरोधात असे वक्तव्य केले नव्हते. यातून दिसून येते की पंजाब सरकार सुद्धा निर्णायकपणे औद्योगिक-वित्तीय भांडवलाच्या बाजूने आहे. यानंतर शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीच्या जनरल सेक्रेटरींनी अमृतपालच्या सरबत खालसा (शिखांच्या सर्व पंथांची एक सल्लामसलत करणारी महत्त्वाची समिती) बोलवण्याच्या मागणीला फेटाळून लावत म्हटले की सरबत खालसा बोलावणे वा न बोलावणे ही अकाल तख्ताच्या अखत्यारीतील बाब आहे. अमृतपालच्या काही समर्थकांकडून चुकीच्या बैठक रचनेसारख्या मुद्द्यांवरून काही गुरुद्वारांमध्ये गोंधळ घातल्यासारख्या घटनांमुळे सुद्धा अनेक लोक त्याच्यापासून दूर झाले आहेत.

पंजाबमधील कुलकांच्या वर्गाच्या हे लक्षात येत आहे की स्वत:च्या भांडवली विकासाच्या दिशेबाबत त्यांच्यात एकमत नाही, आणि पंजाबमध्ये त्यांना व्यापक जनसमर्थन प्राप्त नाही. त्यामुळे पंजाबच्या नजिकच्या भविष्यात अमृतपाल काही विशेष फरक पाडेल असे दिसत नाही. पंजाबच्या कम्युनिस्ट चळवळीच्या काही छोट्या गटांनी सुद्धा वेळोवेळी पंजाबच्या स्वतंत्र होण्याच्या वा खलिस्तानच्या चळवळीच्या मागण्यांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष समर्थन केले आहे. मार्क्सवाद हा राष्ट्रवादाच्या विरोधात उभा आहे, आणि म्हणून राष्ट्रीय दमन अस्तित्वात नसेल तर स्वातंत्र्याची चळवळ उभी करणे हे कामगार वर्गाचे काम नाही, हे तत्त्व ते सतत विसरत आले आहेत.

कामगार वर्गाने अशाप्रकारच्या सर्व धर्मवादी, अस्मिता आधारित आंदोलनांपासून दूर राहिले पाहिजे आणि आपल्या खऱ्या वर्गमागण्यांना घेऊन जसे की रोजगाराचा अधिकार, शिक्षण-आरोग्याचा अधिकार, पेन्शन-घरकुलांचा अधिकार, संघटित झाले पाहिजे आणि भांडवलशाहीला आव्हान दिले पाहिजे. भांडवलशाही अर्थव्यवस्था आज संकटात आहे आणि मंदीचे सावट वाढलेले आहे. अशामध्ये जनतेचा असंतोष वाढून तो भांडवली व्यवस्थेविरोधात संघटित होऊ नये म्हणून गैर-मुद्दे समोर आणणे राजकारणाची गरज बनते. ज्याप्रकारे हिंदुत्व फॅसिस्ट भाजप हिंदुराष्ट्राचे विचारधन वाटत असते, त्याचप्रमाणे आर्थिक संकट वाढेल तसतसे देशाच्या इतर भागांमध्ये भांडवलदार वर्गाचे विविध स्पर्धारत हिस्से अशाप्रकारच्या "भूमिपुत्र", "जनतेचे तारणहार", "मसिहा" व्यक्तींना सतत पुढे आणत राहतील आणि खऱ्या मुद्द्यांपासून जनतेचे लक्ष भरकटवत राहील. आपण, कामगार-कष्टकरी वर्गाने मात्र सतत प्रश्न विचारले पाहिजेत की असे "तारणहार" कोणत्या वर्गाचे प्रतिनिधित्व करतात? अस्मितेवर आधारित ध्रुवीकरणाचा फायदा शेवटी कोणत्या वर्गांना मिळतो? अशाप्रकारच्या राजकारणातून सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समानता कशी मिळेल? याचे कोणतेही उत्तर खरेतर अस्मितावादी राजकारणाकडे नसते. अशा राजकारणाची एकच इच्छा असते की आपण आमच्या वर्गहितासाठी लढणे थांबवावे!

# मोदी आणि भाजपच्या घोटाळे आणि भ्रष्टाचारांचा संक्षिप्त लज्जास्पद इतिहास

पान 12 वरून

आम्ही व्यापम घोटाळ्याचा संदर्भ दिला आहे ज्यासाठी शिवराज सिंह चौहान यांना क्लीन चिट देण्यात आली होती. 2019 मध्ये अशाच प्रकारचा पण त्याहूनही मोठा कोट्यवधी रुपयांचा मेगाभरती घोटाळा 2019 मध्ये महाराष्ट्रातील भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात 11 विभागांमध्ये वर्ग 'क' आणि वर्ग 'ड' पदे भरण्यात झाला. द वायरच्या तपासणी अहवालात फसवणुकीच्या असंख्य पद्धती आढळल्या आहेत. डमी उमेदवारांचा फोटो आणि स्वाक्षरी न जुळण्यापासून ते परीक्षा हॉलमध्ये प्रवेश करताना स्पाय कॅमेरे आणि मायक्रोफोन वापरण्यापर्यंत फसवणुकीचे प्रकार झाले आहेत. परंतु, याबाबत तर आता भांडवली गोदी मीडियात वाच्यताही होताना दिसत नाही!

कोविड अत्युच्च संख्येला पोहोचण्याच्या काळात जेव्हा देशात ऑक्सिजनची गंभीर टंचाई जाणवत होती, स्थलांतरित कामगारांना वाऱ्यावर सोडले गेल्यामुळे ते जेव्हा त्यांच्या मूळ राज्यांकडे परत जाऊ लागले होते, आणि मृतदेह गंगेत तरंगताना दिसले होते, तेव्हा आमचे केंद्र सरकार मात्र पी.एम. केअर्स नावाचा खाजगी फंड स्थापन करून त्याद्वारे व्हेंटीलेटर घोटाळा करण्यात मग्न होते! याच काळात केंद्र सरकारने 20,000 कोटी रुपये खर्च करून नवीन संसदेसाठी 'व्हिस्टा' प्रकल्प चालू करण्याचा निर्णय घेतला. लाखो लोकांचे जीव जात असताना, भव्य इमारतीच्या बांधकामाचा निर्णय घेणे हे या सरकारच्या निर्लज्ज कारभाराचे उदाहरण आहे.

भ्रष्टाचाराविरुद्धच्या आमच्या 'लढवय्या नेत्याने' त्याच्या पहिल्या कार्यकाळात विजय माल्ल्या आणि नीरव मोदी यांना पळून जाऊन दिले असताना, हिंडनबर्ग अहवालाद्वारे आता उघडकीस आलेल्या, अदानी समूहाने खोट्या कंपन्याद्वारे आणि हिशोबातील गडबडींद्वारे केलेल्या घोटाळ्याबद्दल चिडिचूप शांतता बाळगली आहे. एस.बी.आय. किंवा आर.बी.आय. सारख्या कोणत्याही सरकारी संस्थेने आशियातील माजी सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि प्रधानमंत्री मोदींच्या या सर्वात विश्वासू समर्थकांवर कठोर कारवाई केलेली नाही. हे विसरू नये की 2002 च्या गुजरात नरसंहारानंतर अदानी मोदींच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले होते. त्यावेळी जेव्हा भारतीय उद्योग महासंघा(CII)च्या काही नेत्यांनी मोदींवर टीका केली, तेव्हा अदानीसह स्थानिक गुजराती व्यावसायिकांच्या एका गटाने रिसर्जंट ग्रुप ऑफ गुजरात (RGG) नावाची प्रतिस्पर्धी संघटना स्थापन केली, आणि मोदी व सर्व गुजरातींचा अपमान आहे या कारणावरून सी.आय.आय. मधून माघार घेण्याची धमकी दिली होती! भांडवलदार वर्गाचा एक मोठा मोठा हिस्सा अशाप्रकारे मोदी सरकारच्या मागे एकमुखाने उभा आहे हे स्पष्ट आहे.

हे विसरता कामा नये की भ्रष्टाचार ही भांडवलशाहीतील विसंगती नाही, तर ती सर्वसामान्य बाब आहे, कारण संपूर्ण व्यवस्थाच श्रमाच्या शोषणातून कोणत्याही प्रकारे कमाल नफा मिळवण्याच्या, भांडवल "संचया"ला नैतिक मान्यता देण्याच्या तत्त्वावर उभी आहे. भ्रष्टाचारमुक्त 'संत' भांडवलशाही नावाची गोष्ट अस्तित्वात असू शकत नाही. म्हणूनच, जेव्हा जेव्हा याच व्यवस्थेच्या रक्षकांकडून भ्रष्टाचाराविरुद्ध 'युद्ध' छेडले जाते, तेव्हा आपण अत्यंत सावधपणे त्याकडे पाहिले पाहिजे आणि त्यांच्या घोषणांच्या प्रभावात वाहून जाता कामा नये. कॉंग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आप इत्यादी भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्वच राजकीय पक्षांच्या घोटाळे आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची यादी मोठी आहे हे जरी खरे असले तरी "शुचितावादी" भाजप या सर्वांमध्ये आघाडीवर आहे, हे नक्की! हे सर्व पक्ष अंबानी, अदानी, टाटा, बिर्ला सारख्यांनी मिळून बनलेल्या भांडवलदार वर्गाच्या शोषणाच्या व्यवस्थेचे नियमन करणाऱ्या स्पर्धक व्यवस्थापन समित्या आहेत, आणि जातीय-धार्मिक राजकारणाद्वारे जनतेत फूट पाडण्यात तरबेज असलेला हिंदुत्ववादी फॅसिस्ट भाजप हा आज त्यांचा सर्वात विश्वासू, आणि म्हणूनच सर्वात भ्रष्ट, पक्ष आहे.

# कामगार वर्गाचा पक्ष कसा असावा? (पाचवे पुष्प)

✍ सनी

या लेखमालेच्या पहिल्या चार पुष्पांमध्ये आपण कामगार पक्षाच्या क्रांतिकारी प्रचाराच्या स्वरूपावर बोललो. लेनिनने रशियातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांसमोर "सुरुवात कुठून करावी" या लेखामध्ये खालील क्रमाने मांडणीची योजना बनवली होती: क्रांतिकारी प्रचारावर, संघटनात्मक कार्यभारांवर, अखिल रशियन क्रांतिकारी पक्ष बनवण्याच्या योजनेवर. या लेखाचे स्वरूप सुद्धा आम्ही लेनिनच्या लेखनाच्या वरील योजनेच्या धर्तीवरच ठेवले आहे. क्रांतिकारी प्रचाराच्या समस्यांवर चर्चेनंतर आता आपण कामगार पक्षाच्या संघटनात्मक स्वरूपावर बोलूयात. आपण अगोदर इतिहासाच्या माध्यमातून हे समजण्याचा प्रयत्न करू की कशाप्रकारे पक्षाच्या संकल्पनेचा जन्म झाला आणि कशाप्रकारे लेनिनने पक्षाच्या धारणेला विकसित केले.

आपण इतिहासात मागे वळून पाहिले तर मार्क्स-एंगल्सच्या नेतृत्वात बनलेल्या कामगार वर्गाच्या पक्षाच्या संरचनेचे पहिले प्रारुप कम्युनिस्ट लीगच्या स्वरूपात समोर आले. युरोपातील क्रांतिकारी उभाराच्या काळात अग्रदल वर्गाला आणि त्याच्या संघटनेला बहुमोल अनुभव मिळाला. 'लिग ऑफ जस्ट' मधून 'कम्युनिस्ट लीग' बनणे हे ते पहिले पाऊल होते जेव्हा कामगार वर्गाच्या अग्रदलाला कम्युनिस्ट संघटनेचे रूप मिळाले. नंतर मार्क्स आणि एंगल्सने पहिल्या इंटरनॅशनलची स्थापना केली जी आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगार वर्गाची संघटना होती. 1860 च्या दशकात कामगार आंदोलन पुन्हा तीव्र झाले तेव्हा ही संघटना एका राजकीय नेतृत्वाच्या, ताळमेळ केंद्राच्या आणि सल्लागाराच्या भूमिकेत काम करत होती. मार्क्सच्या नंतर एंगल्सच्या नेतृत्वातच आठव्या आणि नवव्या दशकात युरोपात कम्युनिस्ट पक्ष उभे होऊ लागले. कम्युनिस्ट पक्षाची संरचना हा काही कोणी अगोदरच बनवून ठेवलेला सिद्धांत नव्हता, तर भांडवली राज्यसत्तेच्या बदलत्या स्वरूपासोबत तो विकसित होत गेला.

यावर साथी अभिनव यांनी लिहिले आहे की: "मार्क्स आणि एंगल्सच्या काळात भांडवली राज्यसत्तेची संपूर्ण संरचना त्याप्रकारे व्यापक, व्यवस्थित आणि सुदृढ झालेली नव्हती ज्याप्रकारे ती लेनिनच्या काळात झाली होती. एंगल्सच्या जीवनकाळाच्या उत्तरार्धात असे कम्युनिस्ट पक्ष बनू लागले जे बोल्शेविक पक्षासारखे तर नव्हते, पण जन-पक्षासारखे सुद्धा नव्हते. लेनिनने पक्षाच्या सिद्धांताला पहिल्यांदा व्यवस्थित केले, किंवा असे म्हटले पाहिजे की मार्क्सवादातील पक्षाच्या सिद्धांताचे निर्माते लेनिनच होते."

मार्क्स-एंगल्सच्या अगोदर कामगारांच्या पक्षाचे चरित्र जन-पक्षाचे, अभ्यास मंडळांचे, किंवा सत्तापालट उलथवण्याकरिता बनलेल्या गुप्त संघटनांसारखेच होते. मार्क्स आणि एंगल्सने कम्युनिस्ट लीगच्या माध्यमातून संघटनेची एक स्पष्ट संरचना देण्याचा प्रयत्न केला. या अगोदर कामगारांनी ज्या संघटना बनवल्या होत्या, त्या चार्टिस्ट पक्ष, लीग ऑफ जस्ट, आणि असोसिएशन म्हणजे जन-पक्ष किंवा जनसंघटनेसारख्या संघटनात्मक संरचनेत काम करत होते. त्यांचे चरित्र सत्ता उलथवण्याकरिता बनलेल्या दस्त्यांचे, किंवा अभ्यासगटांच्या जाळ्यासारखे, किंवा जनसंघटनेसारखे होते. या संरचना वर्गसंघर्षाच्या आगीत तावून-सुलाखून मजबूत होत गेल्या. याच प्रक्रियेत कम्युनिस्ट संघटनात्मक तत्त्वे सुद्धा निर्माण झाली. त्यांना सूत्रबद्ध करण्याचे काम नंतर सर्वात व्यवस्थित आणि सुसंगत रूपाने लेनिनने केले.

भांडवलशाही अंतिम टप्प्यात पोहोचल्यानंतर भांडवली सत्तेचे सैनिकीकरण आणि अतिकेंद्रीकरण होते. कामगार वर्गाच्या पक्षाची बोल्शेविक संकल्पना सुद्धा एक गरज बनते. लेनिनवादी पक्षाची संकल्पना जॅकोबिन गटापेक्षा किंवा कम्युनिस्ट लीगपेक्षा वेगळी होती. असेच असू शकले असते. वर्गसंघर्ष तीव्र होण्यासोबत आणि सोबतच कामगार वर्गाच्या अग्रदलाच्या केंद्रीकृत संघटनात्मक संरचनेच्या गरजेला धरून निर्माण झालेले ते संघटनात्मक स्वरूप होते. कामगार वर्गाच्या पहिल्या सचेतन क्रांतीला घडवणाऱ्या बोल्शेविक पक्षाच्या संघटनात्मक संरचनेचा इतिहास एका दीर्घ प्रक्रियेचा परिणाम आहे. संघटनेच्या स्वरूपाच्या इतिहासाच्या चर्चेची सुरुवात जॅकोबिन गटापासून होऊ शकते.

लक्षात घ्यावे की लेनिनने रशियातील कम्युनिस्ट आंदोलनात उपस्थित असलेल्या दोन प्रवृत्ती ओळखल्या होत्या, तेंव्हा त्यातील संधिसाधू आणि क्रांतिकारी प्रवृत्तींची तुलना फ्रेंच क्रांतीमधील भांडवलदार वर्गाच्या नेतृत्वात उपस्थित असलेल्या दोन प्रवृत्तींशी केली होती. जॅकोबिन गट हे इतिहासातील संघटनेचे ते पहिले रूप होते ज्यात क्रांतिकारी भांडवलदार वर्ग संघटित झाला होता. त्यांच्या नेतृत्वातच कामकरी वर्ग सुद्धा संघटित झाला होता कारण त्यावेळी व्यापक कामकरी जनता, मध्यमवर्ग, आणि भांडवलदार वर्गाचा एक समाईक शत्रू होता: सरंजामदार वर्ग आणि राजेशाही. या इतिहासावर चर्चा करणे वर्ग संघर्षातील अग्रदलाची भूमिका समजण्यासाठी आणि संघटनात्मक रूप समजण्यासाठी गरजेचे आहे, ती काही पांडित्यपूर्ण कवायत नाही. निरंकुशकतेच्या आणि प्रतिक्रांतिच्या विरोधात संघर्ष करणाऱ्या जॅकोबिन्सच्या विरोधात जिरोंदिन गटाने तडजोड केली. लेनिनने रशियन संधीसाधूंना 'समाजवादी जिरोंदिन गट' म्हटले आणि क्रांतिकारी गटांना 'कामगार वर्गीय जॅकोबिन' म्हटले. बोल्शेविक पक्षातील या दोन प्रवृत्तींची चर्चा रशियन कम्युनिस्ट आंदोलनात अनेक ठिकाणी दिसून येते. प्लेखानोव्ह सुद्धा त्यांच्या क्रांतिकारी काळात दोन गटांची तुलना याचप्रकारे करतात. लेनिन जॅकोबिन गटाबद्दल चर्चा करताना म्हणतात:

"कामगार वर्गाचे इतिहासकार जॅकोबिनवादाला दडपलेल्या वर्गाच्या स्वतंत्रतेच्या एका उच्चतर संघर्षाच्या रूपात बघतात...विसाव्या शतकात जॅकोबिनवाद म्हणजे युरोप आणि आशियाच्या(रशियात) सीमांतावर क्रांतिकारी कामगार वर्गाची सत्ता असेल, जिला शेतकऱ्यांचे समर्थन असेल आणि समाजवादाकडे अग्रेसर होण्याचा भौतिक आधार अस्तित्वात असेल. ही क्रांती ना फक्त 18 व्या शतकातील जॅकोबिन्सच्या क्रांतीच्या महान आणि अमिट प्राप्तींना मिळवून देईल, तर ती कामगारांच्या एका विश्व-विजयी विजयाकडे वाटचाल करू शकते... तो जॅकोबिन ज्याने खऱ्या अर्थाने वर्गहितांना समजले आहे आणि खऱ्या अर्थाने कामगार वर्गाचे अग्रदल आहे, तो एक बोल्शेविक आहे."

लेनिन जॅकोबिन्सची थोडी-थोडी प्रशंसाही करतात. जॅकोबिन गटाने 1789 नंतर क्रांतीला तिच्या निष्कर्षापर्यंत पोहोचवण्याचे काम केले, ज्यामध्ये त्यांना सामान्य कामकरी जनतेचे समर्थन मिळाले. या क्रांती मध्ये सचेतनतेचे तत्त्व सुद्धा होते. प्रबोधन काळातील तत्त्वज्ञांनी एक स्पष्ट राजकीय आधार दिला. एंगल्स फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल लिहितात की:

"महान फ्रेंच क्रांती हा बुर्झ्वा वर्गाचा तिसरा, आणि धार्मिक बुरखा फेकून देण्याच्या बाबतीत पहिला उठाव होती, जी स्पष्ट राजकीय समजदारीच्या आधारावर लढली गेली होती. ती या अर्थाने सुद्धा पहिली होती की तिथे एका स्पर्धकाचा समूळ नाश झाला, आणि दुसऱ्या स्पर्धकाचा म्हणजे भांडवलदार वर्गाचा पूर्ण विजय झाला.

"फ्रांस मध्ये क्रांतीने भूतकाळातील सर्व परंपरांशी पूर्ण विच्छेद केला; क्रांतीने सरंजामशाहीच्या अवशेषांना नष्ट केले आणि सिव्हिल कोड द्वारे रोमन कायद्यांचे कुशल रूपांतरण केले जे मार्क्सने सांगितलेल्या माल उत्पादनाच्या आर्थिक टप्प्याच्या, म्हणजे भांडवलशाहीच्या, कायदेशीर संबंधांना जवळपास पूर्णतेत अभिव्यक्त करत होते."

युरोपात 15 व्या शतकात भांडवलशाहीच्या उद्याची सुरुवात झाली. सामंती समाजाच्या गर्भातच जन्माला आलेल्या भांडवलदार वर्गाने एकेक पाऊल टाकत स्वत:ला मजबूत केले आणि एका दीर्घ ऐतिहासिक संघर्षानंतर सामंती सत्तेचा अंत केला. भांडवलदार वर्गाने या संघर्षात कामकरी वर्गांना सोबत घेतले. एंगल्स भांडवलदार वर्गाच्या तीन महान संघर्षांचा उल्लेख करतात: जर्मन शेतकरी बंड, इंग्लिश क्रांती आणि फ्रेंच क्रांती. फ्रेंच राज्यक्रांती यामध्ये सर्वात प्रमुख आहे जिने सामंती सत्तेला मुळापासून उखडून फेकले. फ्रेंच राज्यक्रांतीला तिच्या निष्कर्षापर्यंत पोहोचवण्याचे काम जॅकोबिन गटाच्या नेतृत्वात झाले. 1789 नंतर 1791 च्या गृहयुद्धात जॅकोबिन्सला सामान्य कष्टकरी वर्गांचे समर्थन मिळाले. 1792 ते 1794 पर्यंत जॅकोबिन्सच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारी सरकार टिकले. मार्क्सच्या शब्दांमध्ये "जॅकोबिन्सनी सामंतवाद ज्या जमिनीत पाय रोवून होता, तिलाच ध्वस्त केले, आणि अनेक वर्षांपासून रुजलेल्या सामंती श्रीमंतांना उखडून फेकले." जॅकोबिन्सचा नेता रोबेस्पियर याला भांडवलदार वर्गानेच सत्तापालट करवत क्रांतीच्या जरा "जास्तच" पुढे जाण्याची शिक्षा दिली आणि त्याचे मुंडके गिलोटिन लावून कलम केले. जॅकोबिन्सनी 1792 ते 1794 या काळात क्रांतीला पुढे नेले आणि बड्या भांडवलदारांनी जुन्या संरचनेसोबत चालवलेल्या तडजोडीच्या प्रयत्नांना आणि प्रतिक्रांतीला हरवले. जॅकोबिन्स आर्थिक स्तरावर निम्न-भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करत होते, पण तो विविध मतांचा एक समूह अधिक होता, ज्यात केंद्रियतेचा अभाव होता. जॅकोबिन्सकडे क्रांतीचा बोल्शेविक पक्षासारखा कार्यक्रम नव्हता, पण एक स्पष्ट राजकीय समज मात्र होती.

फ्रेंच राज्यक्रांती यशस्वी झाल्यानंतर समानता, बंधुता आणि स्वातंत्र्याचे नारे कामकरी जनतेकरिता फक्त कागदी नारेच सिद्ध झाले. एंगल्स सांगतात की भांडवलशाही अस्तित्वात आल्यानंतर "संपत्तीचे स्वातंत्र्य"हे छोट्या उत्पादकांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी "संपत्तीला वंचित होण्याचे स्वातंत्र्य" बनले आणि सरंजामी कु-रितींच्या जागी भांडवली कु-रिति आल्यामुळे व्यापार अधिकाधिक धोकेबाजीचा आणि लबाड बनत गेला. "बंधुत्वाच्या" क्रांतिकारी आदर्शाची जागा व्यापारी स्पर्धेच्या धोकेबाजीने आणि ईर्ष्या व द्वेषाने घेतली. बळ-जुलूम-जबरदस्तीची जागा भ्रष्टाचाराने घेतली सामाजिक शक्तीचे मुख्य अस्त्र तलवारीच्या जागी पैसे बनले. वेश्यावृत्ती तर कधी ऐकले नव्हते इतकी वाढली. विवाह अगोदरप्रमाणेच वेश्यावृत्तीला झाकून ठेवणारे एक आवरण, त्याचे कायद्याद्वारे स्वीकृत रूप बनून राहिला, आणि व्यभिचार मात्र समाजात होतच राहिला. याच परिस्थितीमध्ये मनोराज्यमय समाजवाद्यांनी (फ्रांसचे सेंट सिमोन, फुरिये आणि इंग्लंडचे रॉबर्ट ओवेन) समाजवादाचे आपले सिद्धांत प्रस्तुत केले.

मार्क्सवादी विचारधारा सुद्धा आभाळातून टपकत नाही, तर इतिहास आणि समाजाच्या वैज्ञानिक विश्लेषणाच्या प्रक्रियेत इतिहासातील सिद्धांतांशी टीकात्मक नाते कायम करूनच पैदा होते. कामगार वर्गाच्या पक्षाचे पहिले रूप सुद्धा याचप्रकारे बुर्झ्वा वर्गाच्या संघटनेच्या पहिल्या प्रयोगापासून पुढे जाते. इतिहासातील सर्वाधिक मूलगामी बुर्झ्वा क्रांतीचे नेतृत्व करणारी अग्रदलाची फळी जॅकोबिन गट सुद्धा याच काळात उभा राहतो.

जॅकोबिन गटाचे चरित्र विविध सामाजिक समूहांच्या एका ढिल्या संघासारखे होते, जेव्हा की बोल्शेविक पक्षाने भांडवलदार वर्गाच्या विरोधात एक केंद्रीकृत नेतृत्व प्रदान केले. बोल्शेविक पक्षाने कामगार वर्गाच्या एका किंवा दुसऱ्या गटाचे प्रतिनिधित्व नाही केले, तर बुर्झ्वा वर्गविरोधातील संघर्षात एका वर्गाच्या रूपाने कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व केले. जॅकोबिन क्लबप्रमाणे कम्युनिस्ट पक्ष हा विविध प्रवृत्तींचा मुक्त "संघ" असू शकत नाही. फ्रेंच क्रांतीचे नेतृत्व जॅकोबिन गटच करू शकत होता, आणि ऑक्टोबर क्रांतीचे नेतृत्व बोल्शेविक पक्ष.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर ल्योन शहरात औद्योगिक दंगली, जर्मनीत सिलेसियन कामगारांचे संघर्ष आणि चार्टिस्ट आंदोलनाच्या मैलाच्या दगडांच्या मार्गाने इतिहास 1848 च्या क्रांतीपर्यंत पोहोचतो. याच काळात कामगारांच्या पक्षाच्या रूपात चार्टिस्ट पक्ष आणि लीग ऑफ जस्ट सारख्या संघटना उभ्या होतात. कामगार आंदोलनाने स्वयंस्फूर्त कारवायांच्या पुढे जाऊन जेव्हा देशस्तरावर एकजूट होण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तो काळ कामगार क्रांत्यांचा पहिला काळ होता जेव्हा कम्युनिझमचे भूत सर्व युरोपाला सतावत होते. या काळात जी संरचना अस्तित्वात आली ती परिस्थितींच्या प्रकाशात जन्माला आली होती. हीच कम्युनिस्ट लीग होती. याच काळात मार्क्स व एंगल्सने प्रूधोंवादी, ब्लांकीवादी, लासालवादी, आणि नंतर बर्नस्टीनवाद्यांशी संघर्ष चालवत पक्षाच्या तत्त्वांची पायाभरणी करणे सुरू केले होते. याच वादांनी सुद्धा मार्क्सवादाला उन्नत केले. मार्क्स आणि एंगल्सने कामगार वर्गाच्या संघटनेच्या तत्त्वांच्या पायाभरणीचे सुद्धा काम केले. या काळाबद्दल पुढील पुष्पात चर्चा करुयात.

(मूळ लेख: मजदूर बिगुल, एप्रिल 2023 मध्ये प्रकाशित)

अनुवाद: अभिजित

# शिक्षणाच्या धंद्याचे आले आणखी "अच्छे दिन"

पान 1 वरून

खर्च कमी लागेल, वगैरे. खरेतर देशातील लब्धप्रतिष्ठित वर्ग जो परदेशी शिक्षणाला जातो, त्याचे परदेशात स्थायिक होणे आणि तिथे कमावणे हेच खरे उद्दिष्ट असते, त्यामुळे अशा वर्गालाही ही विद्यापीठे किती आकर्षित करतील यात शंकाच आहे, परंतु धनिक वर्गाला आमिष दाखवत विदेशी विद्यापीठे आणणाऱ्या या सरकारचे कामगार-कष्टकरी वर्गाच्या शिक्षणाप्रती काहीच प्राधान्य नाही हे स्पष्ट आहे! शिक्षणाला धंदा, विद्यार्थ्याला ग्राहक आणि शिक्षक-संस्थाचालक यांना विक्रेते-मालक म्हणून बघणाऱ्यांकडून अशा तर्कांखेरीज अजून काही अपेक्षा केलीही जाऊ शकत नाही.

**गुजरातमधील गिफ्ट सिटीचे मॅनेजिंग डायरेक्टर तपन राय यांचे तर या धंदेबाज शिक्षण-उद्योगांना म्हणणे आहे की जर तुम्ही भारतासारख्या विशाल बाजारात आला नाहीत, तर मागे पडाल**

या शिक्षण-उद्योगांना आवताण किती द्यावे? याचे एक उदाहरण पहा. गुजरातमधील गिफ्ट सिटीचे मॅनेजिंग डायरेक्टर तपन राय यांचे तर या धंदेबाज शिक्षण-उद्योगांना म्हणणे आहे की जर तुम्ही भारतासारख्या विशाल बाजारात आला नाहीत, तर मागे पडाल. त्यांनी कौतुकही केले आहे की भारत सरकारने तर धाडस दाखवत अगोदरच शिक्षणाला एक "वित्तीय सेवा" घोषित केले आहे. देशातील धंदेवाईक शिक्षणसंस्था सुद्धा यात संधी शोधत आहेत. एस.पी. जैन स्कूल ऑफ ग्लोबल मॅनेजमेंटचे अध्यक्ष नितिश जैन यांच्या मते ते सुद्धा या धोरणाकडे आशेने बघत आहेत आणि विदेशी विद्यापीठांसोबत भागीदारी करण्यास तयार आहेत.

अधिकाधिक कमाई हेच उद्दिष्ट असणाऱ्या विदेशी विद्यापीठांचा प्रवेश हा निश्चितपणे देशामध्ये शिक्षणाला अधिक महाग होण्याकडे नेणारा आहे, देशातील सार्वजनिक खर्चाने उभ्या झालेल्या आणि निधीअभावी विकास खुंटलेल्या विद्यापीठांना अजूनच जर्जर करणारा आहे.

देशात विदेशी विद्यापीठांचा "थेट" शिरकाव आता होत असला, तरी मागच्या दाराने त्यांचा प्रवेश होऊन बराच काळ झाला आहे. डिकीन विद्यापीठासारखी विद्यापीठे 29 वर्षांपासून भारतात स्थानिक विद्यापीठांसोबत/शिक्षणसंस्थांसोबत मिळून कार्यरत आहेत. अशात हे पाहणे गरजेचे आहे की देशातील उच्च शिक्षणात खाजगीकरण किती बोकाळले आहे.

## उच्च शिक्षणात प्रचंड खाजगीकरण

आज देशामध्ये जवळपास 700 विद्यापीठे आणि 35,000 कॉलेजेस कार्यरत आहेत, ज्यात जवळपास 3 कोटी (म्हणजे लोकसंख्येच्या फक्त 2.14 टक्के) विद्यार्थी शिकत आहेत. खाजगीकरणाच्या धोरणाच्या परिणामी यापैकी 200 पेक्षा जास्त विद्यापीठे खाजगी आहेत (46 केंद्रिय, 300 राज्य, 207 खाजगी, 128 डीम्ड). एकूण कॉलेजेसपैकी 21,000 पेक्षा जास्त कॉलेजेस खाजगी विना-अनुदानित कॉलेजेस आहेत. 2003 पासून जवळपास वर्षाला 1,000 या वेगाने कॉलेजेसच्या संख्येत वाढ झाली आहे.



आणि सांगायला नको की यापैकी बहुसंख्य कॉलेजेस ही शिक्षणाच्या बाजारात बहरलेली "फुले" आहेत. "स्वायत्त" आणि "डीम्ड" नावाने निघणाऱ्या कॉलेजेस व विद्यापीठांची किंवा त्यातील अनेक अभ्यासक्रमांची स्थिती सुद्धा जवळपास पूर्णतः विना-अनुदानित आहे हे सत्य आता सर्वांसमोर आहे. उत्तर भारतात तर अशा "स्वायत्त" कॉलेजेसची संख्या इतर देशाच्या दुपटीपेक्षा जास्त आहे.

खाजगी बाजारी शिक्षणाच्या या अफाट वाढीचा परिणाम आहे की बहुसंख्यांक कामगार-कष्टकरी वर्गापुढे दर्जेदार उच्च शिक्षण घेण्याचा पर्याय उरलेलाच नाही. आता या स्थितीमध्ये येऊ घातलेली विदेशी विद्यापीठे शिक्षणाच्या बाजाराला अजून मजबूतच करणार आहेत हे निश्चित.

## विदेशी विद्यापीठांकडून दर्जाच्या सुद्धा अपेक्षा नकोत!

**जगातील सर्वोच्च विद्यापीठे त्यांच्या मायदेशात सोडून इतर कोणत्याही देशात गेलेली नाहीत.**

युजीसीच्या धोरणात सुद्धा म्हटले आहे की "उच्च-मानांकित" संस्था भारतात याव्यात म्हणून नियमावली बनवली गेली आहे. आता जर कोणी या भ्रमात असेल की जगातील हार्वर्ड, स्टॅनफर्ड, ऑक्सफर्ड सारखी नावाजलेली विद्यापीठे भारतात त्यांच्या शाखा खोलतील, तर ही अपेक्षा एक दिवास्वप्नच म्हणावे लागेल. ना अशा एखाद्या विद्यापीठाने आपली तशी महत्त्वाकांक्षा जाहीर केली आहे, ना जगाचा आजवरचा अनुभव तसे काही सांगतो.

इतर देशातील विद्यापीठांना निमंत्रण देणाऱ्या जगातील 37 देशांचा सी-बर्ट (C-BERT, क्रॉस बॉर्डर एज्युकेशन रिसर्च टीम) नावाचा एक अभ्यास, ज्यात 306 संस्थांचा अभ्यास केला गेला, असे सांगतो की जगातील सर्वोच्च विद्यापीठे त्यांच्या मायदेशात सोडून इतर कोणत्याही देशात गेलेली नाहीत. चीन (42), युएई (33), सिंगापूर (16), मलेशिया (15), कतार (11) या देशांमध्ये सर्वाधिक विदेशी शिक्षणसंस्था कार्यरत आहेत. यांमध्ये त्या देशातील काही नामांकित शिक्षणसंस्था सोबत मिळून चालू केलेल्या काही "संयुक्त" संस्थांचा अपवाद सोडला (उदा: शिंगुआ-युसी बर्कली) तर जगातील सर्वोच्च 100 विद्यापीठांपैकी कोणीही इतर देशांमध्ये संस्था उभ्या केलेल्या नाहीत. यापैकी अनेक देशांमध्ये तर कर-सवलती, पायाभूत सुविधा देऊ केल्या जात आहेत, तरीही सर्वोच्च शिक्षणसंस्था तेथे जात नाहीत, आणि अपवादाने ज्या संस्था विदेशात गेल्या आहेत त्या तेथील सरकारने प्रचंड अनुदान दिल्यामुळेच. देशातील विद्यापीठांना अनुदानावाचून तडफडवणारे मोदी सरकार आत विदेशी विद्यापीठांना अनुदान देणार आहे का?

विदेशी विद्यापीठांनी जगभरात आपल्या शाखा न उघडण्यामागे स्पष्ट कारण आहे की दर्जेदार उच्च शिक्षणसंस्था या जगभरात प्रकर्षाने, प्रामुख्याने फक्त जनतेच्या निधीतूनच उभ्या झाल्या आहेत, ना की खाजगी नफेखोर धंद्याच्या मार्गाने. अमेरिका-युरोपातीलही अनेक प्रतिष्ठित विद्यापीठे ही दिसायला खाजगी व्यवस्थापित असली तरी त्यांच्या निधीचा मोठा वाटा हा नेहमीच सरकारी प्रकल्पांमधून आला आहे.

## भाजपच्या दाव्यांचे वास्तव उघडे!

"हार्वर्ड" शिक्षित लोक नकोत, "हार्ड वर्क"करणारे पाहिजेत असे प्रधानमंत्री मोदी यांनी 2014 मध्ये म्हटले होते, आणि आता त्याच "हार्वर्ड" सारख्या संस्थांसाठी भाजप पायघड्या पसरत आहे! अर्थात हार्वर्ड सारख्या शिक्षणसंस्था भारतात येण्याची शक्यता नगण्य आहे ही बाब वेगळी! भारताला "विश्वगुरू" बनवण्याच्या वल्गना करणाऱ्या, या देशातच जगातील सर्व ज्ञान निर्माण झाले आहे असा दावा करणाऱ्या संघ परिवाराला, आता देशातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाकरिता विदेशी विद्यापीठांसाठी पायघड्या घालाव्या लागत आहेत. भारत स्वतःहून चांगली शिक्षण व्यवस्था उभी करण्यास अक्षम ठरला आहे, याची ही थेट कबुलीच आहे. काही वर्षांपूर्वी "इंस्टिट्यूट्स ऑफ इमिनन्स" नावाने मोदी सरकारने प्रचंड अनुदान देऊन जागतिक दर्जाच्या शिक्षणसंस्था उभारण्याची घोषणा केली होती, ज्यांचा अजूनही पत्ता नाही! यातूनच या सरकारच्या स्वतःच्या कर्तृत्वाबद्दलच्या दाव्यांची पोलखोल होते.

विश्वगुरू बनण्याचे दिवास्वप्न पाहणाऱ्यांनी हे समजावे की युरोपियन युनियनमध्ये शिकणाऱ्या विदेशी विद्यार्थ्यांचे प्रमाण 13,88,000 आहे, तेच प्रमाण भारतात फक्त 49,000 आहे. अर्जेंटीना, तुर्कस्तान मध्ये सुद्धा भारतापेक्षा जास्त विदेशी विद्यार्थी शिकतात. ही आकडेवारी देण्याचे कारण विदेशी विद्यार्थ्यांना शिकण्याचे निमंत्रण द्यावे याचे समर्थन नाही, तर मोदी सरकारचे दावे किती फसवे आहेत आणि देशातील बाजारी शिक्षणव्यवस्थेला जागतिक बाजारातही किती दुय्यम स्थान आहे हे समजण्याकरिता आहे.

1986 मध्ये कॉंग्रेसने लागू केलेल्या शिक्षण धोरणाने देशात उदारवादाचा, खाजगीकरणाचा पाया घातला आणि आत्ता भाजपच्या 2020 मधील नवीन शिक्षण धोरणाने त्यावर अनेक मजले चढवण्याची सुरुवात केली आहे. सरकारने शिक्षणाच्या जबाबदारीतून काढता पाय घेणे, शिक्षणावरील सार्वजनिक खर्च कमी करणे आणि खाजगी भांडवलाला खुली सूट देणे या धोरणांच्या अंमलबजावणीचे विदेशी विद्यापीठे हे पुढचे पाऊल आहे.

विदेशी विद्यापीठांना आवताण देण्याचे नियोजन तर कॉंग्रेसप्रणित सरकारांच्या काळापासूनच चालू होते. विदेशी विद्यापीठांचा कायदा, "फॉरेन एज्युकेशनल इंस्टिट्युशनस (रेग्युलेशन ऑफ एंट्री ॲंड ऑपरेशन्स), बील – 2010" युपीए-2 ने प्रस्तावित केला होता, परंतु विरोधामुळे त्याला पुढे नेले नाही. कॉंग्रेसच्याच काळात बनलेल्या राष्ट्रीय ज्ञान आयोगाने सन 2006 मध्येच शिक्षणात विदेशी विद्यापीठांच्या प्रवेशाची भलावण केली होती. युपीएच्या राजवटीत भाजप या कायद्यांना सतत विरोध करत होती. परंतु "लोह"पुरुष, बुलडोझर अशी स्वतःची जाहिरात करणाऱ्या मोदी सरकारला मात्र विरोधाकडे दुर्लक्ष करण्यात वा गरज पडल्यास त्याला चिरडण्यात विशेष कौशल्य प्राप्त आहे, आणि त्यामुळे भांडवलदारांच्या हिताचे असे कायदे पारित करण्यात सत्तेत असताना ते विशेष धडाडी दाखवताना दिसतात. हे मात्र नक्की की बड्या भांडवलदार वर्गाच्या दोन प्रमुख पक्षांमध्ये, म्हणजे कॉंग्रेस व भाजपमध्ये या मुद्द्यांवर एकमत आहे.

## बाजारी शिक्षणव्यवस्था संपली पाहिजे!

गेली 30 वर्षे देशामध्ये शिक्षणाच्या क्षेत्रात खाउजा (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) धोरणे राबवली जात आहेत. खाजगी शिक्षणसंस्थांना परवानग्या, फी घेण्यास मोकळे रान देणे, सरकारी शिक्षणसंस्थांना निधीअभावी मरणावस्थेकडे नेणे, सरकारी शिक्षण संस्था बंद करणे वा त्यांचे खाजगीकरण करणे, अशा धोरणांची अंमलबजावणी सत्तेत आलेल्या जवळपास सर्वच पक्षांनी गेली 30 वर्षे केली आहे. याचा परिणाम आहे की आज दर्जेदार उच्च शिक्षण ही फक्त मूठभर वरच्या वर्गाची मक्तेदारी बनली आहे, आणि कामगार-कष्टकरी जनतेपासून ही संधी आज कोसो दूर आहे.

शिक्षणाच्या बाजारी दुनियेत मुठभरांकरिता अत्युच्च सुविधा देणाऱ्या अगदी थोड्या संस्था, आणि बहुसंख्यांकरिता उतरत्या क्रमाने दर्जा घसरत जाणाऱ्या आणि संख्या वाढत जाणाऱ्या संस्था अशीच संरचना निर्माण होऊ शकते, कारण बाजाराची गरज तीच असते: कमी संख्येने कुशल कामगार, आणि जास्त संख्येने अकुशल कामगार निर्माण करणे. परिणामी आज देशातील कोट्यवधी, बहुसंख्यांक, कामगार-कष्टकरी जनतेला उद्योगांकरिता स्वस्तात काम करणारे अकुशल कामगार बनवणारे शिक्षण घेणे हाच पर्याय उरला आहे आणि विकासाच्या शक्यता जवळपास संपवल्या गेल्या आहेत.

मोदी सरकारने विदेशी विद्यापीठांना निमंत्रण देऊन यात पुढचे पाऊल टाकले आहे. परंतु याही पुढे जाऊन अनेक पावले उचलली जाणार आहेत. धंदेबाज विद्यापीठांना नफा कमावणे सोपे व्हावे म्हणून, त्यांना करावे लागणारे उत्तरदायित्वाचे काम अजून कमी व्हावे म्हणून, विविध व्यावसायिक शिक्षणधारांना नियंत्रित करणाऱ्या स्वतंत्र व्यावसायिक नियामक अथोरिटींना (जसे की वकिलांकरिता बार कौन्सिल, डॉक्टरांकरिता मेडिकल कौन्सिल, इंजिनिअरींग करिता ए.आय.सी.टी.ई., विद्यापीठांकरिता यु.जी.सी.) रद्द करून एकच नियामक मंडळ स्थापन करावे, आणि त्यामध्ये सुद्धा उद्योगधंद्यांच्या प्रतिनिधींना नियंत्रणाला जास्तीत जास्त वाव द्यावा यावर सुद्धा मोदी सरकार आता गांभीर्याने विचार करत आहे.

भांडवली उत्पादन व्यवस्था प्रत्येक गोष्टीला माल, बाजारातील खरेदी विक्रीचा जिन्नस, बनवत जाते, आणि शिक्षणाचे बाजारीकरण हा याच व्यवस्थेचा भाग आहे. सर्वांना सरकारी निधीतून समान, मोफत, दर्जेदार शिक्षणासाठीचा लढा उभा करणे हाच या बाजारीकरणाला थांबवण्याचा आणि शिक्षण अधिकार मिळवण्याचा मार्ग आहे.

# महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि धर्मवादाच्या विरोधात भगतसिंह जनअधिकार यात्रेचा पहिला टप्पा पूर्ण

✒ बिगुल डेस्क

12 मार्च ते 14 एप्रिल दरम्यान देशाच्या 11 राज्यांमध्ये भगतसिंह जनअधिकार यात्रा आयोजित केली गेली. भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाच्या (RWPI) पुढाकाराने दिल्लीमध्ये पत्रकार परिषद घेऊन मार्च महिन्याच्या सुरुवातीला यात्रेची घोषणा केली गेली आणि यात्रेमध्ये सामील होण्याचे आवाहन केले गेले. भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष, नौजवान भारत सभा, दिशा विद्यार्थी संघटना, स्त्री मुक्ती लीग, महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन व इतर अनेक जनसंघटनांच्या वतीने ही यात्रा आयोजित केली गेली. दिल्ली, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, हरियाणा, पंजाब, बिहार, उत्तराखंड, आंध्र प्रदेश, तेलंगण, चंडीगढ, आणि राजस्थानतील विविध शहरांमध्ये ही यात्रा कामकरी जनतेपर्यंत पोहोचली. 15 एप्रिल रोजी यात्रेच्या पहिल्या टप्प्याच्या समारोपाचा कार्यक्रम आयोजित केला गेला.

महाराष्ट्रात पुणे, मुंबई आणि अहमदनगर शहरांच्या विविध भागांमध्ये, कामगार वस्त्यांमध्ये ही पदयात्रा पोहोचली. पुणे शहरात अप्पर इंदिरानगर पासून सुरू करत पद्मावती, केके मार्केट, इंदिरा नगर, आंबेडकर नगर, प्रेम नगर, भारती विद्यापीठ, तळजई, साठे नगर, पर्वती दर्शन, जनता वसाहत, दांडेकर पूल, शास्त्री नगर, शिवदर्शन, भवानी पेठ, काशेवाडी ते लोहियानगर अशी पदयात्रा आयोजित केली गेली. मुंबईमध्ये कुर्ला स्टेशन, बेंद्रे चौक, टीस संस्था, देवनार, मानखुर्द, चेंबूर, विद्याविहार, घाटकोपर, जागृतीनगर, साकीनाका, जरीमरी, कुर्ला पश्चिम ते मुंबई विद्यापीठ अशी पदयात्रा आयोजित केली गेली. अहमदनगर शहराच्या माळीवाडा, कापड बाजार, विनसेंटपुरा, सर्जेपूरा, कवलारू, रामवाडी, कोठला, मुकुंद नगर, सिद्धार्थनगर अशा अनेक वस्त्यांमध्ये यात्रा पोहोचली. 23 मार्च रोजी शहीद दिनानिमित्त आणि 11 एप्रिल रोजी महात्मा फुले जन्मदिनानिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. यात्रेदरम्यान विविध ठिकाणी चौक सभा केल्या गेल्या, क्रांतिकारी गीते सादर केली गेली, जनतेच्या दारापर्यंत पोहोचून संवाद साधला गेला आणि मोदी सरकारच्या गेल्या 9 वर्षातील कार्यकाळात जनतेवर ओढवलेल्या संकटांचा आढावा मांडत खऱ्या मागण्या काय असल्या पाहिजेत याबद्दल सघन प्रचार अभियान राबवले गेले. महागाई आणि बेरोजगारीने सर्वाधिक त्रस्त असलेल्या कामगार-कष्टकरी जनतेचा या यात्रेच्या प्रचाराच्या मुद्यांना प्रचंड प्रतिसाद होता. भांडवलदारांनी पोसलेल्या गोदी मीडियाद्वारे केल्या जात असलेल्या प्रचंड प्रचारानंतरही मोदी सरकारच्या शेकडो "जुमल्यांचे" सत्य जनतेला आता समजू लागले आहे याचा प्रत्यक्ष अनुभव या यात्रेमध्ये जनतेने दिला. स्त्री मुक्ती लीग आणि महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनने, तसेच अनेक न्यायप्रिय नागरिकांनी सुद्धा यात्रेमध्ये सहभाग नोंदवला. 15 एप्रिल रोजी अप्पर इंदिरानगर, पुणे येथे यात्रेच्या पहिल्या टप्प्याच्या समापनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

दिल्ली-एन.सी.आर. च्य भागामध्ये नरेला पासून सुरू होत यात्रा पश्चिम दिल्लीच्या नांगलोई, सुलतानपुरी, मायापुरीतून जात उत्तर पूर्वेकडील करावल नगर, मुस्तफाबाद, लक्ष्मीनगर भागांमध्ये सुद्धा गेली. दक्षिण व मध्य दिल्लीतून जात यात्रा नॉयडा, आणि गुडगावच्या कामगार बहुल वस्त्यांमध्ये पोहोचली. या दरम्यान अनेक भागांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा आयोजित केले गेले. अनुष्टुप बॅंडने क्रांतिकारी गीते प्रस्तुत केली. 15



एप्रिल रोजी जंतर-मंतर येथे यात्रेचा पहिला टप्पा संपन्न झाला. सोबतच 'तमाशा' आणि 'राजा का बाजा' या दोन सडक नाटकांचे सुद्धा सादरीकरण केले गेले. यात्रा दिल्लीच्या अनेक औद्योगिक क्षेत्रांमधून सुद्धा गेली. कामावर जात असलेल्या कामगारांमध्ये पत्रकांचे व्यापक वितरण केले गेले. मोदी सरकार थोपवत असलेल्या चार नवीन श्रम कायद्यांचे कामगार-विरोधी चरित्र उघडे पाडत कामगारांना ठेकेदारीविरोधात, या नवीन कायद्यांविरोधात एकजूट होण्याचे आवाहन करण्यात आले. हे

उत्तरप्रदेशात भगतसिंह जनअधिकार यात्रा अलाहाबाद, चित्रकूट, गोरखपूर, आंबेडकर नगर, मऊ, गाझीपूर, आजमगड, सहारनपूर, मथुरा, वाराणसी आणि लखनौ अशा अनेक ठिकाणी पोहोचली. प्रत्येक शहरात, गावात अनेक ठिकाणी सभा घेण्यात आल्या.

हरियाणामध्ये कैथल, कलायत, नरवाणा, रोहतकच्या अनेक गावांमध्ये यात्रा पोहोचली. बिहारमध्ये पटना, आणि जहानाबाद मध्ये लोकांमध्ये व्यापक पत्रक वितरण केले गेले आणि सभा करत यात्रा काढली गेली. उत्तराखंड मध्ये डेहरादून, हरिद्वार, बिजनौर, सहारनपूर, खटीमा, रूद्रपूरच्या विविध भागांमध्ये यात्रा गेली.

पंजाबच्या बठिंड्यातून यात्रेची जोरदार सुरुवात झाली. यासोबतच आंध्र प्रदेशात अमरावती जवळ मंगलगिरी, ताडेपल्ली रह्मानंदपुरम, डोलास नगर, गांधीनगर, प्रकाश नगर, लेनिन नगर, बाबू जगजीवन राम कॉलोनी, सुंदरय्या प्रेस वर्कर्स कॉलोनी, नुलकपेट या भागांमध्ये यात्रा पोहोचली. तेलंगणामध्ये राजधानी हैदराबादच्या विविध वस्त्यांमध्ये आणि राजस्थानच्या शहरांमध्ये सुद्धा यात्रा संपन्न झाली.

यात्रेदरम्यान सर्वत्र दिसून आले की युवकांची एक मोठी संख्या हताश-निराश आहे. विद्यार्थी-कर्मचारी-कामगारांसहित सामान्य जनतेचा प्रत्येक हिस्सा भाजपच्या कारभाराला बळी पडला आहे, तर दुसरीकडे धर्माच्या नावाने उन्माद पसरवला जात आहे, जेणेकरून जनतेला खऱ्या मुद्यांपासून भरकटवता यावे. जनतेच्याच एका हिश्श्याला खोटा शत्रू म्हणून जनतेत स्थापित केले जात आहे, जेणेकरून खरा शत्रू ओळखता येऊ नये. इंग्रजांनीच चालवलेल्या 'फोडा आणि राज्य करा'च्या धोरणांना लागू करत मोदी सरकार इमाने-एतबारे भांडवलदार वर्गाची सेवा करण्यात गुंतले आहे.

यात्रेदरम्यान सभांमध्ये वक्त्यांनी मांडले की स्वातंत्र्याच्या 75 वर्षांमध्ये जनतेने भाजप पासून कॉंग्रेस, सप, बसप, राजद, जदयू, आप सारख्या सर्व भांडवली पक्षांना संधी देऊन त्यांचे वास्तव पाहिले आहे. अच्छे दिन तर दूरच राहिले गेल्या 9 वर्षात स्थिती अधिकाधिक वाईट झाली आहे. जनतेच्या आसवांचे सागरात मोठमोठे धनदांडगे, बिल्डर, धनिक शेतकरी, आणि भांडवलदारांच्या विलासितेचे महाल वाढत चालले आहेत. प्राथमिक असो वा उच्च शिक्षण, आज दोन्ही नफ्याकरिता आहेत आणि जनतेच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. शाळा-कॉलेजांमध्ये रिक्त असलेल्या लाखो जागा भरण्यात सरकारला रस नाही, तर उलट अधिकाधिक खाजगीकरण करण्याचेच काम भाजपने चालवले आहे. नवीन शिक्षण धोरण तर याला अधिक वेगाने पुढे नेत आहे. सतत वाढती फी याचाच परिणाम आहे. दरवर्षी दोन कोटी रोजगार देण्याचे आश्वासन देणाऱ्या मोदी सरकारने बेरोजगारी उच्चांकाला पोहोचवली आहे, आणि 32 कोटी जनता बेरोजगारीचा मार सहन करत आहे. कोव्हिड काळात बेरोजगार झालेल्या दर 5 पैकी 1 माणसाला अजूनही रोजगार मिळालेला नाही. तर दुसरीकडे बेरोजगार युवकांनी भजी तळावीत असे सल्ले देऊन मोदी सरकार जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहे. देशभरात रामनवमी आणि हनुमान जयंतीचे निमित्त करून संघ परिवारातर्फे जो धार्मिक उन्माद पसरवला गेला आणि दंगलींचे वातावरण बनवले गेले त्याविरोधात जनतेला जागृत करत, धार्मिक सलोखा राखण्याचे आणि फॅसिझम विरोधात संघटित होण्याचे आवाहन केले गेले.

वक्त्यांनी मांडले की या यात्रेचे उद्दिष्ट आहे की जनतेला तिच्या खऱ्या अधिकारांबद्दल जागृत करणे, सचेतन करणे, आणि त्यांना मिळवण्यासाठी संघटित होऊन संघर्ष करणे. सर्वांना रोजगार, समान-विनामूल्य-दर्जेदार शिक्षण व आरोग्यसुविधा, प्रत्येकाला सरकारी विमा, आणि खरी धर्मनिरपेक्षता हे आपले अधिकार असले पाहिजेत. भगतसिंहांच्या शब्दांमध्ये जर एखादे सरकार खरे अधिकार देऊ शकत नसेल तर अशा सरकारला राहण्याचा काही अधिकार नाही. जर व्यवस्था हा अधिकार देत नसेल, तर त्या व्यवस्थेला सुद्धा राहण्याचा काहीच अधिकार नाही. इतिहासात जनतेने संघर्षांमधूनच अधिकार मिळवले आहेत आणि एकजूट झाल्यास जनता हे सर्व अधिकार मिळवू शकते. एका अशा व्यवस्थेच्या निर्मितीसाठी आपल्याला एकजूट व्हावे लागेल जिच्यामध्ये उत्पादन, राज्यकारभार आणि समाजाच्या संरचनेवर कामगार-कष्टकरी जनतेचे नियंत्रण असेल. या दूरगामी लक्ष्यापर्यंत जाण्यासाठी सुरुवात आपल्या खऱ्या मूलभूत अधिकारांसाठी म्हणजे शिक्षण, रोजगार, आरोग्य, आवास, याकरिता सरकारला घेरत संघर्ष करण्यातूनच होऊ शकेल.

भगतसिंह जनअधिकार यात्रेने खालील मागण्या जनतेपर्यंत पोहोचवल्या:

1. रोजगार हा मूलभूत अधिकार म्हणून संविधानात समाविष्ट केला पाहिजे. भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा (BSNEGA) संसदेत पारित करा, ज्या अंतर्गत सर्व काम करण्यायोग्य नागरिकांना नोकरी देणे सरकारची जबाबदारी असेल आणि नोकरी देऊ शकत नसेल तर किमान रु. 10,000 बेरोजगारी भत्ता द्यावा लागेल. सर्व राज्य सरकारांनी आपापल्या विधानसभांमध्ये असा रोजगार हमी कायदा मंजूर करावा. जो सत्ताधारी पक्ष याला विरोध करेल तो स्पष्टपणे जनविरोधी आहे.

2. तात्कालिकरित्या सर्व रिक्त सरकारी पदांवर भरती करावी, त्यासाठी आवश्यक परीक्षांचे आयोजन केले जावे, सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण थांबवावे आणि देशाच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा निर्माण, गृहनिर्माण इ. सुविधांच्या विस्तारासाठी नवीन जागा काढून त्यांत भरती

# मोदी आणि भाजपच्या घोटाळे आणि भ्रष्टाचारांचा संक्षिप्त लज्जास्पद इतिहास

✎ शशांक

नवी दिल्लीतील पक्षाच्या मुख्यालयाच्या विस्तारित इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी भाजप नेते आणि कार्यकर्त्यांना संबोधित करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 28 मार्च 2023 रोजी आरोप केला की भ्रष्टाचारावर कारवाई करणाऱ्या घटनात्मक संस्थांचे नुकसान करण्यासाठी देशातील आणि बाहेरील शक्तींकडून षडयंत्र रचले जात आहे. बेरोजगारी, महागाई आणि देशातील कामगार-कष्टकरी जनतेची दैन्यावस्था यासारख्या समस्यांना वेगाने वाढवणाऱ्या भारतीय जनता पक्षाने 9 वर्षे राज्य केल्यानंतर 2024 च्या लोकसभा निवडणुकीसाठी स्वत:च्या कर्तृत्वाला नाही, तर आपल्या विरोधकांच्या भ्रष्टाचाराला प्रमुख निवडणूक मुद्दा बनवण्याचे ठरवले आहे असे दिसते. पण मोदी सरकार आणि केंद्रातील असोत किंवा कोणत्याही राज्यातील सर्व भाजप सरकारे, यांच्या स्वत:च्या भ्रष्टाचाराचा प्रकरणांचा इतिहास पाहिल्यानंतर लक्षात येते की, ही “भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा” म्हणजे एक विनोदच आहे.

भाजपने एकीकडे इतर पक्षांमधील भ्रष्ट नेत्यांना स्वत:मध्ये सामील करून घेऊन स्वच्छतेचे प्रमाणपत्र देण्याचा कार्यक्रम चालवला आहे, तर दुसरीकडे कॉर्पोरेट कंपन्या, उद्योगपती, मोठमोठे व्यापारी, स्वत:चे नेते यांचे हित साधण्यासाठी “कायदेशीर” आणि बेकायदेशीर भ्रष्टाचाराचे विक्रम केले आहेत. गुजरातच्या मुख्यमंत्रीपदापासून ते केंद्रातील दुसऱ्या सरकारपर्यंत मोदींचा स्वत:चा इतिहास भ्रष्टाचाराच्या दाबलेल्या प्रकरणांनी भरलेला आहे.

भ्रष्ट नेत्यांना स्वच्छ करणाऱ्या भाजपच्या “धुलाई” मशीनची काही प्रमुख उदाहरणे पाहूयात. 2014 पासून, भाजप केंद्रात सत्तेवर आल्यावर, पक्षाने हिमंता बिस्वा सरमा ( काँग्रेस पक्षाचे माजी सदस्य आणि आता भाजपचे आसामचे मुख्यमंत्री), बंगालचे नेते सुवेंदू अधिकारी (तृणमूल काँग्रेस पक्षाचे माजी सदस्य, जे पश्चिम बंगालमधील 2021 च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये सामील झाले) आणि महाराष्ट्राचे नेते नारायण राणे (काँग्रेस पक्षाचे माजी सदस्य, माजी मुख्यमंत्री आणि आता भाजपचे केंद्रीय मंत्री) यांचे स्वागत केले. यापैकी प्रत्येक राजकारणी 2014 पासून थेट कोणत्या ना कोणत्या राष्ट्रीय तपास एजन्सीच्या रडारवर होता, आणि यांच्यावर मोठमोठ्या भ्रष्टाचारांचे आरोप खुद्द भाजपने केले होते, परंतु ज्या दिवशी ते भाजपमध्ये सामील झाले त्या दिवशी त्यांच्या भ्रष्टाचारावर सफेदी चढवली गेली! थोडक्यात, जेव्हा भ्रष्टाचारी फॅसिस्टांच्या रांगेत, भाजपमध्ये, सामील होतात, तेव्हा त्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्धचा भाजपचा संघर्ष संपलेला असतो! थोडक्यात, भ्रष्टाचार करा, पण भाजपमध्ये येऊन करा, असे भाजपचे धोरण आहे.

2014 पासून, जेव्हा अण्णा आंदोलनाच्या (अण्णा हजारे तेव्हापासून गैरहजर आहेत, 2014 पासून झालेल्या सर्व घोटाळ्यांबाबत नि:शब्द, त्याचे कारण काय असावे?) “भ्रष्टाचारविरोधी लाटे” वर स्वार होऊन हे फॅसिस्ट सत्तेवर आले, तेव्हापासूनची काही उल्लेखनीय प्रकरणे पाहूयात. “भ्रष्टाचाराच्या विरोधातले लढवय्ये” श्रीयुत मोदी स्वतः भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकरणांमध्ये सामील आहेत ज्याबद्दल ते आणि त्यांचा पक्ष मुद्दाम कधीच बोलत नाहीत.



## भ्रष्टाचाराचे गुजरात मॉडेल

2014 मध्ये फॅसिस्ट सत्तेवर आल्यानंतर भाजपच्या सदस्यांनी आणि मोदी सरकारने “राष्ट्रीय हितासाठी” केलेल्या काही घोटाळ्यांकडे बघण्याआधी, आपल्या प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या प्रसिद्ध “गुजरात मॉडेल”मध्ये सर्वप्रथम भ्रष्टाचाराचे हे मॉडेल अंमलात आणले होते हे आपण जाणून घेतले पाहिजे. 2004-05 मध्ये त्यांनी गावातील तलाव खोदणाऱ्या मजुरांमध्ये वाटप करण्यासाठी असलेले अनुदानित तांदूळ खुल्या बाजारात वळवल्याचा आरोप समोर आला. हा घोटाळा 500 कोटींचा होता. 2005 पासून, अदानी समूहाला बंदर आणि विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) उभारण्यासाठी रु. 1.32 प्रति चौरस मीटर भावाने जमीन दिली गेली, जेव्हा सरासरी बाजारभाव रु. 1,100 प्रति चौरस मीटर होता, ज्यामुळे राज्य सरकारचे अंदाजे 6,546 कोटी रु.चे नुकसान झाले. साणंद येथे, टाटा समूहाला नॅनो कार प्रकल्पासाठी 900 रुपये प्रति चौरस मीटर या बाजारभावाने जमीन दिली गेली, जेव्हा बाजारभाव रु. 10,000 चौरस मीटर होता आणि यामुळे अंदाजे 33,000 कोटी रु.चे नुकसान झाले. 2011-12 मध्ये, नरेंद्र मोदींनी फोर्ड, एल अँड टी, रिलायन्स आणि एस्सार सारख्या खाजगी कंपन्यांना सरकारी जमीन विकण्याचा घाट घातला आणि त्यामुळे अंदाजे 500 कोटी रु. चे नुकसान झाले. 2006-09 दरम्यान, जी.एस.पी.सी.च्या मालकीचा नैसर्गिक वायू अदानी एनर्जीला स्वस्त दरात विकला गेला, ज्यामुळे राज्य सरकारला 70.5 कोटी रु. तोटा झाला. भाजप सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशनला (ओएनजीसी) सर्व तोट्यासह जीएसपीसी खरेदी करण्यास भाग पाडले. हे सर्व नुकसान सरकार कसे भरून काढते, तर तुमच्या आमच्याकडून वसूल केलेल्या अप्रत्यक्ष आणि प्रत्यक्ष करांच्या पैशातून. म्हणजेच ही कष्टकरी जनतेकडून मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांकडे पैसे हस्तांतरित करण्याची योजना आहे. ही त्या “व्हायब्रंट” गुजरातची फक्त काही ज्ञात प्रकरणे आहेत, ज्या गुजरातचे नेतृत्व मोदी करत होते. ज्याप्रकारे नुकतेच भाजपने अटक करवलेल्या आम आदमी पक्षाच्या सिसोदियांनी दारू “धोरणा”च्या माध्यमातून मूठभर भांडवलदारांना फायदा पोहचवत भ्रष्टाचार केला आहे, त्याच प्रकारे खुद्द मोदींनी हे सर्व भ्रष्टाचार केले आहेत!

मोठमोठ्या भांडवलदारांना पोहोचवत आलेल्या या फायद्याचा सुद्धा परिणाम आहे की भाजप भांडवलदारांचा लाडका पक्ष झाला आहे. कॉर्पोरेट घराण्यांनी गेली 10 वर्षे सर्वाधिक निधी भाजपला पुरवला आहे तो उगीचच नाही!

## भ्रष्टाचाराचा पहिला टप्पा: 2014-19

मोदींच्या “न्यू इंडिया” मध्ये समोर आलेल्या सर्वात कुप्रसिद्ध घोटाळ्यापासून म्हणजे राफेल डील (घोटाळा) पासून सुरुवात करूयात. फ्रेंच उत्पादक दसॉल्टसोबतचा कुप्रसिद्ध करार करताना मोदी सरकारने पूर्वीचा 2012 साली झालेला करार रद्द केला, ज्याद्वारे 18 लढाऊ विमाने प्रत्येकी 530 कोटी रुपयांना थेट फ्रान्सकडून विकत घ्यायची होती आणि 108 विमाने सार्वजनिक क्षेत्रातील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड ही कंपनी ट्रान्सफर ऑफ टेक्नॉलॉजी (ToT) अंतर्गत भारतात सह-निर्मित करणार होती. पंतप्रधान मोदींच्या फ्रान्स भेटीनंतर एक नवीन करार झाला ज्यामध्ये सरकार प्रत्येकी 1600 (म्हणजे तिप्पट किमतीला!) कोटींना 36विमाने खरेदी करेल असे ठरले! हे सर्व मोदी सरकारने त्यांच्या एका “धन्याला” खूश करण्यासाठी केले होते, म्हणजेच अनिल अंबानी यांना. हे उघड होते कारण 2012 चा करार रद्द झाल्यानंतर अवघ्या दोन आठवड्यांत दसाल्ट कंपनीने रिलायन्ससोबत एक संयुक्त कंपनी स्थापन केली, रिलायन्सला भारतातील भागीदार बनवले आणि एच.ए.एल. ला बाहेर ढकलले. मीडियापार्ट या स्वतंत्र फ्रेंच तपास ऑनलाइन वृत्तपत्राने दिलेल्या अहवालात असे दिसून आले आहे की दसॉल्ट आणि अनिल अंबानी यांच्या कंपनीमधील पहिला सामंजस्य करार प्रत्यक्षात 26 मार्च 2015 रोजी झाला होता, तर पंतप्रधान मोदींनी 126 विमानांसाठीचा पूर्वीचे करार रद्द करण्याचा निर्णय एप्रिल 2015 मध्ये जाहीर केला होता. थोडक्यात, अंबानींचा करार अगोदर झाला आणि त्यानंतर भारत सरकारने करार बदलवला.

विदेशातून काळा पैसा परत आणूच्या वल्गना करणाऱ्या मोदी सरकारने तर भ्रष्ट उद्योगपतींना देशातून पळून जाण्याचा राजमार्ग उपलब्ध करून देण्यात नवीन उच्चांक स्थापित केले आहेत. नोटाबंदीच्या काळात जनतेला राष्ट्रसेवा म्हणून काळ्या पैशाविरुद्ध लढण्यासाठी लांब रांगांमध्ये उभे राहण्याची गरज का आहे याबद्दल उपदेशामृत पाजले जात असताना, विजय मल्ल्या, नीरव मोदी आणि मेहुल चौकसी (22,500 कोटींची एकत्रित फसवणूक) सारख्या धनदांडग्यांना पळून जाण्याची परवानगी देण्यात आली. कष्टकरी जनतेच्या कष्टाच्या पैशातून उभ्या राहिलेल्या एस.बी. आय. आणि पी.एन.बी. सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून घेतलेल्या कर्जातून त्यांनी जमा केलेल्या संपत्तीवर टाच किमान यावी याचीही काळजी सरकारने घेतली. विशेष म्हणजे, पी.एन.बी. ने सी.बी.आय. कडे नीरव मोदी विरुद्ध पहिली तक्रार पाठवण्याच्या 6 दिवसांपूर्वी, नीरव मोदी हा इतर भारतीय सीईओ आणि प्रधानमंत्री मोदींसोबत वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये दिसला होता! विदेशातून काळा पैसा आणणे तर दूरच, मोदी सरकारच्या काळात नीशल मोदी, ललित मोदी, नितीन संदेसरा, दिप्ती संदेसरा, संजय भंडारी ,विनय मिश्रा, हजरा मेमन अशा फरार आर्थिक गुन्हेगारांची संख्या 33 वर जाऊन पोहोचली आहे.

आता आपण नरेंद्र मोदींनी गंभीर घोटाळ्यांमध्ये गुंतलेल्या त्यांच्या पक्षातील सहकाऱ्यांना दिलेल्या प्रशस्ती पत्रांकडे नजर टाकूयात. इतर पक्षांमधून भरती करवलेल्या नवीन सदस्यांव्यतिरिक्त, भाजपमधीलच इतर अनेक जुने नेते आहेत, जे भ्रष्टाचाराच्या मुद्यांशी थेट जोडलेले आहेत. भाजप सरकारे आणि त्यांच्या नेत्यांच्या वैयक्तिक सर्व ज्ञात भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची थोडक्यात माहिती दिली तरी एक संपूर्ण स्वतंत्र पुस्तक बनेल. आम्ही फक्त भाजपतील दोन सर्वात “आदरणीय” नेत्यांचा उल्लेख करत आहोत: शिवराज सिंह चौहान आणि बी.एस. येडियुरप्पा. मोदींच्या नेतृत्वाखालील सीबीआयने मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री चौहान यांना 2017 मध्ये झालेल्या व्यापम घोटाळ्यात क्लीन चिट दिली. प्रवेश परिक्षेसंदर्भात झालेल्या या घोटाळ्यात एकामागून एक असे अनेक व्हिसल-ब्लोअर (गुन्हा उघडकीस आणणारे) आणि साक्षीदार रहस्यमयपणे मरण पावले आहेत, ज्यांची संख्या काही माध्यमांच्या अंदाजानुसार 40 हून अधिक आहे. दुसरीकडे जमीन आणि खाण घोटाळ्यातील आरोपी, येडियुरप्पा आहेत ज्यांच्या ताब्यातून जप्त केलेल्या डायरीत भाजपचे सर्वोच्च नेते, न्यायाधीश आणि वकिलांना मोठ्या प्रमाणात रकमा दिल्या गेल्याचे दिसून आले. अपेक्षेप्रमाणे तपास यंत्रणांच्या कुचकामी कामामुळे ते आज बहुतेक सर्व आरोपातून निर्दोष मुक्त होऊन अभिमानाने मिरवत आहेत. वर्षानुवर्षे त्यांची चौकशी करणारी सीबीआय मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर मात्र येडीयुरप्पांविरुद्ध पुरेसे पुरावे देऊ शकली नाही!

## भ्रष्टाचाराचा दुसरा टप्पा: 2019-23

मोदी सरकारच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील भ्रष्टाचारांमध्ये मोठ्या प्रमाणात जनतेचे बँकांमधील पैसे बुडवले गेले आहेत. अनेक उद्योगपतींनी मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन ते न चुकवता बँकाच्या अकार्यक्षम संपत्तीमध्ये (नॉन परफॉर्मिंग ॲसेटस, एनपीए) वाढ करून बँकाना डबघाईला आणले आहे. नरेंद्र मोदींच्या कारकिर्दीच्या पहिल्या आठ वर्षांमध्ये, मुख्यत: मोठ्या कॉर्पोरेट कर्जदारांनी, बँकांमधून सुमारे 12 लाख कोटी रुपये पद्धतशीरपणे पळवले आहेत. आपापल्या उद्योगांच्या युनिट्ससाठी कर्ज घेऊन आणि नंतर त्यांना अप्राप्त अकार्यक्षम संपत्ती म्हणून त्यांना खारीज (राइट ऑफ) करून हे अगदी ‘कायदेशीरपणे’ केले गेले आहे. साहजिकच, एवढी मोठी पण सुरळीत कारवाई (लूट!) राजकीय पाठिंब्याशिवाय शक्यच नाही.

पान 8 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित